उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

## चीनकडून सर्वात मोठ्या रेल्वे स्टेशनची उभारणी

**बीजिंग :** चीनने क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठे रेल्वे स्थानक साकारले आहे. तब्बल १२.२ लाख चौरस मीटर परिसरात पसरलेल्या या ट्रान्झिट हबने जपानच्या नगोय स्थानकाला मागे टाकले आहे. नगोय स्थानकाचे एकूण क्षेत्रफळ जवळपास ४.४ लाख चौरस मीटर आहे. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेल्या एलन मस्क यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरुन चीनच्या चोंगकिंग ईस्ट रेल्वे स्टेशनचा एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्यानंतर हा महाकाय प्रकल्प जगात चर्चेचा विषय ठरला.

# येत्या ३० जूनपूर्वी शेतकरी कर्जमाफी

## मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा ; ८० टक्के कर्जवितरणाचे उद्दिष्ट

**मुंबई** - राज्य सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी नेमकी कधी होणार याची तारीख आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितली आहे. येत्या ३० जून पूर्वी सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. त्यामुळे पुढच्या हंगामासाठी या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा असेल. तसेच राष्ट्रीयकृत बँकांनी त्यांचे कृषी संदर्भातील ८० टक्के कर्जवितरणाचे टार्गेट पूर्ण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सांगितले.

सगळ्या बँकांसोबत कर्जमाफी संदर्भात चर्चा केली आहे. कर्जमाफीची माहिती कोणत्या फॉरमॅटमध्ये द्यायची याची चर्चा झाली आहे. वेळेत कर्जमाफी पूर्ण करू शकू याचं नियोजन केले आहे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी महाविस्तार ॲप सुरू करण्यात आले आहे. त्या आधारे शेतकऱ्यांना पीक पद्धती आणि इतर माहिती एआयच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. शेतकरी आपले प्रश्न त्याला विचारु शकतो. त्यावर आवश्यक ती माहिती या ॲपच्या माध्यमातून दिली जाणार आहे.

### सिबिल स्कोरची मागणी नको



कर्जाचे वाटप करताना शेतकऱ्यांकडून सीबील स्कोअरची मागणी करू नये, त्यांची कसलीही अडचण करू नये असे निर्देश देण्यात आले आहेत. राज्य सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीची योजना जाहीर केली आहे. पण ती नेमकी कधी होणार याची नेमकी माहिती मात्र समोर आली नव्हती. त्यावरून शेतकरी आणि बँकांमध्ये संभ्रमाची स्थिती निर्माण झाली होती. त्यानंतर ही कर्जमाफी ३० जूनच्या आधी करण्याची मोठी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली.

### ८० टक्के कर्जवितरण करा

मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या खरीप हंगामाची पूर्वतयारीची बैठक घेतली. त्या आधी बँकर्ससोबत कर्जवाटपासंदर्भात बैठक झाली. त्यामध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांना कर्ज कसे मिळेल यांची तजवीज करण्यात आली. जिल्हा सहकारी, ग्रामीण बँक मिळून ६७ टक्के कर्ज दिले जाते तर २६ टक्के कर्ज हे इतर राष्ट्रीयकृत बँकांकडून देण्यात येते. परंतु राष्ट्रीयकृत बँकांकडून त्यांचे ८० टक्के कर्जवितरणाचे टार्गेट पूर्ण होत नाही, ते त्यांनी पूर्ण करावे असे फडणवीस म्हणाले.

शेतकऱ्यांना पुरवण्यात येणाऱ्या खतांच्या पुरवठ्यावर सरकारचे कडक लक्ष आहे. यावर्षी जागतिक परिस्थितीमुळे खतांच्या उत्पादनावर अधिक ताण असेल.

औद्योगिक क्षेत्रासाठी खतं वळवली जात नाही आहे ना, याकडे लक्ष दिलं जाणार आहे. त्यासंबंधी व्हिडीओग्राफी आपण करणार आहोत. पाण्याचा कमीत कमी उपयोग कसा करता येईल असा प्रयत्न करावा लागेल. पिकांचे सायकल कसे नीट करता येईल असा प्रयत्न करायला पाहिजे. ३० जून पूर्वी कर्जमाफी करणार आहोत, पुढच्या हंगामासाठी आपले शेतकरी कर्जासाठी पात्र असणार असे फडणवीस म्हणाले.

# विदर्भाला उष्णतेचा तडाखा, राज्यात अनेक ठिकाणी अलर्ट



## आद्रता कमी झाल्याने तीव्रता वाढल्याचा अंदाज

**नागपूर** - महाराष्ट्रात तापमानवाढीचे मोठे संकट ओढावले आहे. विदर्भात तर तापमानवाढीचा अक्षरशः स्फोट होताना दिसत आहे. विदर्भात सूर्य आग ओकतोय असेच चित्र आहे . वर्धा जिल्ह्यात तापमान ४७ अंशापर्यंत पोहोचले . तसेच नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये तापमानाचा

▸▸ पान २ वर

### रेड अलर्टमुळे चिंता !

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भातील तीन जिल्ह्यांना तापमानवाढीचा अक्षरशः रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर काही काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. विशेष म्हणजे याआधी यलो अलर्ट दिला तेव्हाच परिस्थिती भीषण होती. त्यामुळे रेड अलर्टमुळे तापमानातवाढीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. हवामान विभागाचे तज्ज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे.

## संक्षिप्त बातम्या

### नीट पेपर फुटी प्रकरणी लातूरमधून पालकाला अटक

**लातूर :** नीट पेपर फुटी प्रकरणी लातूरमधून पहिल्यांदाच सीबीआयने पालकावर कारवाई केली आहे. डॉ. मनोज शिरुरे यांना लातूरमधून अटक करण्यात आली. लातूरमधून ही तिसरी अटक आहे. डॉ. मनोज शिरुरे हे बालरोग तज्ज्ञ असून, ते यापूर्वी याच प्रकरणात अटक झालेल्या पी व्ही कुलकर्णी आणि मोटेगावकर यांच्या संपर्कात असल्याचे समोर आले आहे. दरम्यान डॉ. मनोज शिरुरे यांना अटक केल्यानंतर आता सीबीआयकडून लातूरमधील त्यांच्या घरी, हॉस्पिटलमध्ये आणि बाजूच्या अपार्टमेंटमध्ये देखील चौकशी करण्यात आली. याचदरम्यान एक धक्कादायक प्रकार घडला तो म्हणजे मनोज शिरुरे यांच्या घराशेजारी असलेल्या मयुरेश्वर अपार्टमेंटमध्ये चौकशीसाठी जात असताना सीबीआय पथक लिफ्टमध्ये अडकले होते. मध्येच विद्युत पुरवठा खंडित झाल्यामुळे सीबीआय पथक लिफ्टमध्ये अडकले, त्यानंतर थोड्याच वेळात त्यांची लिफ्टमधून सुटका करण्यात आली. मनोज शिरुरे हे कुलकर्णी आणि मोटेगावकर यांच्या संपर्कात होते, अशी माहिती समोर येत आहे. मनोज शिरुरे याने मोटेगावकर याच्याकडून पेपर घेतल्याचा आरोप आहे. मुलासाठी त्याने पेपर घेतल्याचा आरोप आहे. दरम्यान दुसरीकडे अंबाजोगाई येथील दोन विद्यार्थ्यांची देखील सीबीआयकडून चौकशी करण्यात आली. चौकशीनंतर या विद्यार्थ्यांना सीबीआयने सोबत घेतल्याची माहिती समोर येत आहे.

### बंगळुरु एअरपोर्टवर विमान अपघात, १७९ विमान प्रवाशांचे प्राण वाचले

**बंगळुरु :** एअर इंडियाच्या दिल्लीहून बंगळुरुला जाणाऱ्या एका विमानाला लँडिंग करताना मोठा अपघात झाल्याची घटना घडली आहे. बंगलुरु एअरपोर्टवर उतरताना एअर इंडियाच्या फ्लाईट क्रमांक २६५१ टेल-स्ट्राईक अपघाताचा फटका बसला. विमानाचा खालचा भाग अचानक रनवेला घासला गेला. मात्र, पायलटने मोठे प्रसंगावधान राखले आणि विमानाला सुरक्षितपणे लँड केले. विमानातील सर्व प्रवासी आणि क्रु मेंबर्सना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. एअर इंडियाच्या या विमानात १७९ प्रवासी होते. या सर्व प्रवाशांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. प्रवाशांनी भरलेल्या या विमानाच्या पायलटला लँडींग करताना पुढे उड्डाण घेणाऱ्या एका अन्य विमानामुळे वेक टर्बुलन्सचा त्रास झाला. त्यामुळे विमानाचे नियंत्रण प्रभावित झाले आणि विमानाची शेपटी रनवेला घासली गेली. विमानाला तपासणी करण्यासाठी ग्राऊंड करण्यात आले आहे. या घटनेमुळे बंगलुरुवरुन दिल्लीला जाणारी फ्लाईट २६५२ला रद्द करावी लागली. एअरलाईनने प्रभावित झालेल्या प्रवाशांसाठी पर्यायी व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला. बंगळुरु एअरपोर्टवर एअर इंडियाच्या ग्राऊंड टीम प्रवाशांना आवश्यक सहकार्य केले जात आहे.

# रिकव्हरी एजन्सीज आरबीआयच्या नियंत्रणात ?

## बँक कर्जदारांना मिळणार दिलासा

### आरबीआय कडून लवकरच नवीन नियम लागू

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँकेने बँक लोन रिकव्हरी प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुरक्षित बनवण्यासाठी नवीन नियम जारी केले आहेत. या नियमांमुळे रिकव्हरी एजंट्सच्या मनमानीला चाप बसणार आहे आणि कर्ज घेणाऱ्या ग्राहकांचे अधिकार मजबूत होणार आहेत. जर हे नियम मंजूर झाले, तर १ ऑक्टोबर २०२६ पासून सर्व बँकांना याचे पालन करावे लागणार आहे. त्यामुळे बँकांच्या रिकव्हरी एजंट्सकडून होणारा मानसिक त्रास, धमक्या अणि दादागिरीला आता लगाम बसणार आहे.

आरबीआयने तयार केलेला हा नवीन नियम सर्व व्यावसायिक बँकांसाठी लागू असेल. स्मॉल फायनान्स बँक, पेमेंट बँक आणि लोरल एरिया बँकांना यातून सध्या वगळण्यात आले आहे. आरबीआयने या कच्च्या आराखड्यात पहिल्यांदाच रिकव्हरी एजन्सी आणि रिकव्हरी एचंट यांची व्याख्या स्पष्ट केली आहे. बँकेने कर्ज वसुलीसाठी नेमलेली बाहेरील संस्था आता रिकव्हरी एजन्सी म्हणून मानली जाईल. तर ग्राहकांशी थेट संपर्क साधणारी व्यक्ती रिकव्हरी एजंट असेल. यामध्ये वसुलीचे काम करणाऱ्या अधिकृत प्रतिनिधीचाही समावेश करण्यात आला आहे. यामुळे

▸▸ पान २ वर

### वसूली एजंट्सची पार्श्वभूमी तपासणार

नव्या नियमांनुसार, बँकांना आता एक सविस्तर रिकव्हरी पॉलिसी तयार करणे आवश्यक आहे. यामध्ये ग्राहकांच्या तक्रारी निवारणाची व्यवस्था, एजन्सींची तपासणी प्रक्रिया आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एजंटने चुकीची किंवा बेकायदेशीर कारवाई केल्यास ग्राहकाला भरपाई देण्याची तरतूद बंधनकारक असेल. याशिवाय, वसूली एजंट्सच्या पार्श्वभूमीची पोलिसांकडून तापसणी आणि ते सिद्ध करणारे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. त्यांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग अँड फायनान्सकडून प्रमाणपत्र घ्यावे लागेल आणि निश्चित केलेल्या आचरसंहितेचे पालन करावे लागेल.

### ठराविक वेळेव्यतिरिक्त संपर्क केल्यास गुन्हा

नवीन नियमांनुसार, रिकव्हरी एजंट्स ग्राहकाला सकाळी ८ ते संध्याकाळी ७ या वेळेतच संपर्क साधू शकतात किंवा त्यांच्या घरी भेट देऊ शकतात. या वेळेतच ते ग्राहकाशी संपर्क साधू शकतात. जर त्यांनी या वेळेतच संपर्क साधला नाही, तर तो गुन्हा ठरेल. तसेच सारखा–सारखा फोल करणे, धमकावणे, शिवीगाळ करणे, मानसिक दबाव टाकणे किंवा सोशल मीडियावर बदनामी करणे हे सर्व गोष्टी पूर्णपणे बंद आहेत. ग्राहकांच्या हक्कांचे पालन करणे आवश्यक आहे.

# पेपरफुटी प्रकरण : अंबाजोगाईतील शिक्षिकाआईसह बहीण–भावाची सीबीआयकडून कसून चौकशी

**बीड :** देशात खळबळ उडवून देणाऱ्या पेपरफुटी प्रकरणात आता बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील दोन विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या शिक्षिका आईची सीबीआय केंद्रीय अन्वेषण विभागाकडून तब्बल सव्वादोन तास कसून चौकशी करण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. चौकशी करण्यात आलेले हे दोन्ही बहीण-भाऊ लातूरमध्ये शिक्षण घेत होते. यापैकी बहीण रिपीटर विद्यार्थीनी असून ती पुन्हा नीट परीक्षा देत होती. तर भाऊ पहिल्यांदाच परीक्षेला बसला होता. हा पेपर या दोघांसाठीच घेण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

चौकशीनंतर या प्रकरणातून आणखी

▸▸ पान २ वर



### शिक्षक संघटनेचा मोटेगावकर ब्रँड अँम्बेसिडर

नीट घोटाळ्याचा कथित मास्टरमाईंड पी. व्ही. कुलकर्णी याचे बीड कनेक्शन समोर आल्यानंतर आता आणखी एक धक्कादायक बाब उघड झाली आहे. बीडमधील प्रोफेशनल टीचर्स असोसिएशन या शिक्षक संघटनेचा शिवराज मोटेगावकर ब्रँड अँबेसिडर असल्याचे समोर आले. २०२४ मध्ये या संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाच्या लेटरहेडवर मोटेगावकरचा ब्रँड अँबेसिडर, असा उल्लेख आढळून आला आहे. यामुळे मोटेगावकरशी संबंधित क्लास चालक आणि शैक्षणिक नेटवर्कही आता संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. बीड शहरातील शाहूनगर परिसरात अनेक कोचिंग क्लासेस आणि शिक्षण संकुले कार्यरत असून या भागाला शैक्षणिक हब म्हणून ओळखले जाते.

# पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाइंड ठार

## अज्ञात हल्लेखोरांनी झाडल्या गोळ्या

**नवी दिल्ली :** भारतातील पुलवामा दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाइंड असलेला दहशतवादी हमजा बुरहान याची पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. मुझफ्फराबादमध्ये अज्ञात हल्लेखोरांनी हमजा बुरहानला लक्ष्य केले, यामध्ये त्याचा जागीच मृत्यू झाला.

हमजा बुरहान हा पाकिस्तानमधील दहशतवादी नेटवर्कशी जोडलेला होता आणि पुलवामा हल्ल्याच्या कटात त्याची मुख्य भूमिका मानली जात होती. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू-



काश्मीरमध्ये पुलवामा हल्ला झाला होता, ज्यामध्ये सीआरपीएफचे ४० जवान शहीद झाले होते. या हल्ल्याने संपूर्ण देश हादरला होता आणि यानंतर भारताने बालाकोट एअरस्ट्राइक करून दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य केले होते.

सूत्रांनुसार, हमजा बुरहान बऱ्याच काळापासून सुरक्षा यंत्रणांच्या रडारवर होता. त्याची हत्या अशावेळी झाली आहे, जेव्हा पाकिस्तानमध्ये दहशतवादी संघटना आणि कट्टरपंथी नेटवर्कशी संबंधित अनेक लोकांवर गूढ हल्ले होण्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. अलीकडच्या वर्षांत अनेक दहशतवाद्यांचा एकतर गँगवॉरमध्ये मृत्यू झाला आहे किंवा अज्ञात हल्लेखोरांनी त्यांना लक्ष्य केले आहे. मुझफ्फराबादमध्ये घडलेल्या या घटनेनंतर परिसरात सुरक्षा

▸▸ पान २ वर

# किशोरवयीन जोडप्यांतील परस्पर संमतींच्या संबंधांना सुरक्षा

## नेपाळमध्ये रोमिओ–ज्युलिएट कलमाची चर्चा

**काठमांडू :** नेपाळमधील रोमिओ-ज्युलिएट कलमाचा समावेश करण्याच्या प्रस्तावामुळे चर्चेला उधाण आले आहे. किशोरवयीन मुला-मुलींमधील परस्पर संमतीने झालेल्या शारीरिक संबंधांना आपोआप अत्याचाराचे प्रकरण मानले जाण्यापासून रोखणे हा या बदलाचा उद्देश आहे.

नेपाळच्या राष्ट्रीय फौजदारी संहितेतील या प्रस्तावित दुरुस्तीचा उद्देश, विशेषतः किशोरवयीन संबंध आणि आंतरजातीय जोडप्यांच्या प्रकरणांमध्ये अत्याचाराच्या तरतुदींच्या गैरवापराबाबत वाढणाऱ्या चिंता दूर करणे हा आहे.

नेपाळच्या सध्याच्या कायदेशीर



चौकटीनुसार, १८ वर्षांखालील व्यक्तीचा समावेश असलेले कोणतेही लैंगिक संबंध परस्पर संमती असले तरीही आपोआपच वैधानिक अत्याचार म्हणून वर्गीकृत केले जातात. येथे शरीरसंबंधांना संमतीचे कायदेशीर वय १८ वर्षे असले, तरी विवाहाचे कायदेशीर वय मात्र २० वर्षेच आहे ; यामुळे निर्माण झालेल्या कायदेशीर विसंगतीवर कायदेतज्ज्ञ आणि युवा कार्यकर्त्यांकडून वाढत्या प्रमाणात टीका केली जात आहे.

परस्पर संमतीने झालेल्या संबंधांबद्दल कळल्यावर कुटुंबे अनेकदा किशोरवयीन मुलांविरुद्ध फौजदारी तक्रारी दाखल करण्यासाठी वैधानिक अत्याचाराच्या कायद्याचा वापर करतात, असे या प्रकरणाची तपासणी करणाऱ्या एका सरकारी कृती दलाला आढळून आले. विशेषतः पळून जाऊन केलेले विवाह किंवा आंतरजातीय संबंधांच्या बाबतीत हे घडताना दिसून आले. विद्यमान कायदा अल्पवयीन मुलांना शोषणापासून संरक्षण देण्याऐवजी अनेकदा परस्पर संमतीने झालेल्या किशोरवयीन संबंधांनाच गुन्हेगार ठरवतो, असा अधिकाऱ्यांचा युक्तिवाद आहे.

# धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा

## कॉकरोच जनता पार्टीची एक्सवर मागणी

**नवी दिल्ली :** सोशल मीडियावर नुकतीच स्थापन केलेल्या कॉकरोच जनता पार्टीने केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. नीट यूजी पेपरफुटी प्रकरणात लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देखील धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती.




सोशल मीडियावर चर्चेत असलेल्या कॉकरोच जनता पार्टीचे नवे एक्स अकाऊंट कॉकरोच इज बॅक या नावाने सुरु करण्यात आले आहे. या पार्टीच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील खात्यावरुन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या नव्या प्लॅटफॉर्मचे फॉलोअर्स ४३.६ हजारांवर पोहोचले आहेत. अभिजीत दीपके संस्थापक असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या नव्या खात्यावरील तिसऱ्याच पोस्टमध्ये धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

▸▸ पान २ वर

# अण्णासाहेब पाटील महामंडळासाठी १५० कोटी

## मराठा आंदोलक मनोज जरांगेंच्या आंदोलनाच्या घोषणेनंतर सरकारचे पाऊल

**मुंबई** - मराठा समाजातील तरुणांसाठी राज्य सरकारकडून मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळासाठी १५० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. यापूर्वी २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात महामंडळासाठी ७५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. आता त्यातील पहिल्या टप्प्यातील निधी वितरणाला सुरुवात झाल्याने मराठा समाजातील स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या तरुणांना मोठा आधार मिळणार आहे.

नियोजन विभागाकडून यासंदर्भातील



शासन निर्णय जारी करण्यात आला असून पहिल्या टप्प्यात १५० कोटी रुपयांचा निधी महामंडळाला देण्यात आला आहे. या निधीतून विविध रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योग योजनांना चालना दिली जाणार आहे. अण्णासाहेब पाटील महामंडळामार्फत मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि सुशिक्षित बेरोजगार तरुणांना व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य,




कर्ज सुविधा आणि विविध योजनांचा लाभ दिला जातो.

महामंडळासाठी मंजूर निधी टप्प्याटप्प्याने वितरित केला जातो. २० टक्के, ३० टक्के, ४० टक्के आणि ५० टक्के अशा स्वरूपात निधी

▸▸ पान २ वर

### उपोषणाच्या घोषणेचा परिणाम ?

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय समोर आल्याने त्याकडे राजकीयदृष्ट्या ही महत्त्वाने पाहिले जात आहे. अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आलेला असताना सरकारकडून निधी वितरणाचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे मराठा समाजाशी संबंधित प्रश्नांवर सरकारकडून हालचाली सुरू झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू असून मंत्री प्रसाद लाड यांनीही जरांगे यांचे भेट घेण्याचे जाहीर केले आहे.

### दक्षता घेण्याचेही आदेश

निधी खर्च करताना शासनाच्या वित्तीय नियमावली आणि अटी–शर्तींचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. निधीच्या वापरात कोणतीही अनियमितता होऊ नये, यासाठी विशेष दक्षता घेण्याचे आदेश शासनाने संबंधित विभागांना दिले आहेत.महामंडळाच्या योजनांचा लाभ अधिकाधिक तरुणांना मिळावा यासाठी उत्पन्न मर्यादेतही वाढ करण्यात आली आहे. सुरुवातीला वार्षिक ६ लाख रुपयांपर्यंत असलेली मर्यादा वाढवून ८ लाख रुपये करण्यात आली आहे.

## संक्षिप्त बातम्या

### स्कोडा ऑटो इंडियाने नवीन मोहीम केली सुरू 'ग्रेटेस्ट ऑन अ ट्रॅक'

एका सर्किटवर एकाच उत्पादकाच्या वाहनांचा सर्वात वेगवान मल्टी-कार रिले पूर्ण करत इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद ब्रँडच्या मोटरस्पोर्ट वारशाला आणि उत्पादन पोर्टफोलिओच्या डायनॅमिक क्षमतांना अधिक अधोरेखित करणारी मोहीम

छत्रपती संभाजीनगर : वेगवान उत्पादन उपक्रम आणि सातत्यपूर्ण नेटवर्क विस्ताराच्या पार्श्वभूमीवर, स्कोडा ऑटो इंडियाने स्कोडाच्या परफॉर्मन्स-केंद्रित प्रवासाला अधोरेखित करणारी आपली नवीन मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेची सुरुवात एका विक्रमासह करण्यात आली असून, 'ग्रेटेस्ट ऑन अ ट्रॅक' म्हणजेच 'ट्रॅकवरील स्कोडा' हे सिद्ध करणाऱ्या अनेक उपक्रमांपैकी हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. १३० वर्षांच्या जागतिक वारशासह आणि मोटरस्पोर्टमधील १२५ वर्षांच्या समृद्ध इतिहासासह, स्कोडा ऑटोने या नव्या मानदंड प्रस्थापित करणाऱ्या ब्रँड मोहिमेद्वारे आपल्या रेसिंग वारशाला अधिक बळकटी दिली आहे. तसेच, ब्रँड आपल्या वाहनांमधील प्रतिष्ठित आरएस (रॅली स्पोर्ट) बॅजच्या अर्धशतकाहून अधिक प्रवासाचाही गौरव करत आहे. 'डिफरेंशिएशन' या आपल्या प्रमुख धोरणात्मक स्तंभाला अधिक मजबूत करत, ही नवी मोहीम स्कोडा ऑटो इंडियाच्या वाहन श्रेणीतील डायनॅमिक क्षमता आणि सुरक्षिततेवर प्रकाश टाकते.

या मोहिमेबद्दल बोलताना, स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता म्हणाले, ''प्रत्येक स्कोडा वाहन अचूकता, नियंत्रण आणि सर्वोच्च स्तरावरील परफॉर्मन्स देण्यासाठी अभियांत्रिकीदृष्ट्या विकसित करण्यात आले आहे. आमच्यासाठी मोटरस्पोर्ट डीएनए ही केवळ ओळख नाही, तर ती आमच्या प्रत्येक वाहनामध्ये नैसर्गिकरित्या समाविष्ट आहे आणि आमच्या संपूर्ण वाहन श्रेणीत मानक स्वरूपात उपलब्ध आहे. हाच विश्वास आमच्या नव्या मोहिमेचा पाया आहे, ज्यामध्ये आम्ही 'ग्रेटेस्ट ऑन अ ट्रॅक'ची नव्याने व्याख्या करत आहोत. आणि त्याचा साधा अर्थ म्हणजे 'ट्रॅकवरील स्कोडा'.

### नीव्ह फाउंडेशननेसमर रीलीफ मोहिमसुरू केली

**छत्रपती संभजीनगर -** भारताच्या बहुतांश भागांमध्ये तापमानाने ४५अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला असताना नीव्ह फाउंडेशननेया हंगामातील तीव्र उष्णतेचा सामना करावा लागत असलेले मैदानी भागातील कामगार,सामान्य जनता,भटके प्राणी आणि पक्षी यांना दिलासा देण्यासाठी'इस गर्मी, फर्क नजर आयेगा'ही मोठ्या प्रमाणावरील समर रीलीफ मोहिम सुरू केली आहे. हा उपक्रम राजस्थान,गुजरात,मध्य प्रदेश,उत्तर प्रदेश,हरियाणा आणि महाराष्ट्र या ६ राज्यांमध्ये राबवला जात आहे.या उपक्रमाबाबतमत व्यक्त करतवंडर सिमेंटचेसंचालक आणि नीव्ह फाउंडेशनचे संस्थापक श्री.विवेक पटनीम्हणाले, ''भारतात उन्हाळा बहुतांश वेळ घराबाहेरघालवावालागणाऱ्या व्यक्तींसाठीदिवसेंदिवस अत्यंत कठीण होत चालला आहे.

### नवीन इंटेलिजेंट आयवेअरची पहिली झलक

**छत्रपती संभाजीनगर :** सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कंपनी लिमिटेड आणि गुगलने आज गुगल आय/ओ २०२६ मध्ये आयवेअर भागीदार जेंटल मॉन्स्टर आणि वॉर्बी पार्कर यांच्या सहयोगाने डिझाइन केलेल्या दोन प्रीमियम मॉडेल्सची पहिली झलक दाखवत नवीन इंटेलिजेंट आयवेअरचे१ अनावरण केले. मोबाइल फोनसाठी सहयोगी डिवाईस म्हणून काम करण्यासाठी डिझाइन केलेले हे नवीन आयवेअर वापरकर्त्यांना आवाजाच्या संवादाद्वारे मदत मिळवण्यास आणि त्यांच्या फोनशी विनासायासपणे जोडले जाण्यास सक्षम करते, जेथे ही सुविधा नेहमीच्या चष्म्याच्या रचनेत मिळते.

### जैवविविधता दिनानिमित्त टोयोटा किर्लोस्कर मोटर ची पर्यावरण संवर्धनासाठी वचनबद्धता अधिक मजबूत

**बंगळुरू :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिन २०२६ निमित्त पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेच्या जतनासाठी आपली वचनबद्धता अधिक दृढ केली आहे. टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५० (टीईसी २०५०) अंतर्गत कंपनीने वृक्षारोपण,जलसंधारण,तलाव पुनरुज्जीवन आणि परिसंस्था पुनर्बांधणीसारखे विविध उपक्रम राबवले आहेत. 'रिस्पेक्ट फॉर द प्लॅनेट' या तत्त्वज्ञानावर आधारित हे उपक्रम कंपनीच्या उत्पादन प्रकल्पांबरोबरच समुदाय स्तरावरही पर्यावरणीय जबाबदारी मजबूत करत आहेत.

# माहेश्वरी समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे : प्रदेशाध्यक्ष गांधी

## कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी**



लातूर जिल्हा माहेश्वर सभेची नुतन कार्यकारिणीची नुकतीच निवड झालेली असून नवनिर्वाचित पदाधिकारीही परंपरा अबाधितपणे पुढे चालू ठेवतील, असा विश्वास व्यक्त करून या कार्यकारिणीने समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन सभेचे प्रदेशाध्यक्ष मधुसुदन गांधी यांनी केले.

लातूर जिल्हा माहेश्वरी सभेची नुतन कार्यकारिणीची निवड झाली असून या कार्यकारिणीच्या पदग्रहण सोहळ्यात प्रदेशाध्यक्ष गांधी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी प्रदेशाध्यक्ष श्रीकिशन भन्साळी, महिला संघटनच्या प्रदेश सचिव अनिता मालू, जिल्हा माहेश्वरी सभेचे नुतन अध्यक्ष सी. ए. प्रकाश कासट, प्रदेशचे जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश तापडीया यांच्यासह नवनिर्वाचित सचिव राजेश मंत्री व जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. हरिप्रसाद सोमाणी, बालकिशन मुंदडा, गोविंद कोठारी, फुलचंद काबरा, गोकुळदास चांडक आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रदेशाध्यक्ष गांधी म्हणाले की, समाजाला एका धाग्यात बांधण्यासाठी माहेश्वरी सभा कार्यरत आहे. सभेच्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून राज्यात समाजाचे संघटन वाढवत त्यांना एकजूट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होतात. समाज ज्यावेळी एकत्रित होतो त्याच वेळाला समाजाची प्रगती होते हाच इतिहास असून तो न विसरता लातूर जिल्ह्यातील माहेश्वरी सभेच्या पदाधिकाऱ्यांना आपले मतभेत व मनभेद बाजूला ठेवत आगामी तीन वर्ष समाज हितासाठी कार्यरत रहावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, सभेचे अध्यक्ष म्हणून दुसऱ्यांदा काम करण्याची संधी दिल्याबद्दल समाज बांधवांचे आभार व्यक्त करत जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष सी. ए. प्रकाश कासट यांनी हे पद नसून जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले. याप्रसंगी निवडणुक निर्णय अधिकारी हरिप्रसाद सोमाणी यांनी नुतन कार्यकारिणीची घोषणा केली. यावेळी प्रदेशाध्यक्ष मधुसुदन गांधी व मान्यवरांच्या हस्ते नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये अध्यक्ष सी. ए. प्रकाश कासट, सचिव राजेश मंत्री, उपाध्यक्ष चांदकिरण लड्डा, विष्णूदास मंत्री, शामसुंदर मानधना, सहसचिव गोकुलदास चांडक, दिलीप सोमाणी, नंदकिशोर कर्वा, संघटनमंत्री फुलचंद काबरा, कोषाध्यक्ष जगदीश भुतडा व प्रचारप्रमुख नंदकिशोर लोहिया यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन लक्ष्मीकांत सोनी व ईश्वरप्रसाद बिदादा तर आभार फुलचंद काबरा यांनी मानले.

# पंच कुंडात्मक याग पवमान स्वाहाकार महायज्ञाचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी**

येथील श्री केशवराज मंदिरात २१ ते दि. २३ मे २०२६ या कालावधीत पंच कुंडात्मक महाविष्णू याग व पवमान स्वाहाकार महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक विधी श्रीक्षेत्र मोहटादेवीचे प्रधान आचार्य बबनदेव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

प्रत्येक तीन वर्षांनी येणाऱ्या अधिकमासाच्या निमित्ताने यावर्षीच्या अधिकमासामध्ये पूर्णवादाचार्य सदगुरु श्री रामचंद्र महाराज पारनेरकर यांच्या शुभाशिर्वादाने व पूर्णवाद वर्धिष्णू विष्णू महाराज पारनेरकर यांच्या प्रेरणेने सदर धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यज्ञकाळात सामूहिक श्री विष्णू सहस्त्रनाम पठण , सामूहिक श्री सूक्त पठण व कुंकुमार्चन तसेच स्वर्णीनंद ग्रुपकडून गायनसेवा सादर होणार आहे. दररोज सायंकाळी आठ ते नऊ या वेळेत भजनसेवा होणार आहे. या पवित्र काळात श्री केशवराजच्या मूर्तीस तीन दिवस विष्णू सहस्त्रनामासह १ लाख तुलशी अर्पण केल्या जातात. या सोहळ्याचे मुख्य महाप्रसाद यजमान दीपक हरी कोटलवार हे आहेत. मुख्य तुलशी अर्चना यजमान पापशेठ ताथवडे परिवार, मुख्य यज्ञ यजमान धर्मवीर भारती , आयोजक केशवराज मंदिर हे आहेत.

या धार्मिक सोहळ्याचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा,असे आवाहन केशवराज मंदिरचे विश्वस्त अध्यक्ष ॲड. संजय पांडे, उपाध्यक्ष बजरंगलाल रांदड, सचिव मधुकर पाठक, अशोक गोविंदपूरकर, पापासेठ ताथोडे, ॲड. कालिदास देशपांडे, मनोहर सावळे, मधुसूदन भुतडा, दामोदर भुतडा, राजाभाऊ पांडे, शाम कोटलवार, योगेश उन्हाळे, सुनील अयाचित, सुमुख गोविंदपूरकर यांनी केले आहे.

# डॉ. दिलीपराव पुंडे यांची राष्ट्रीय सर्पदंश सल्लागार समितीत निवड

## खा. रविंद्र चव्हाण यांच्या वतीने सन्मान

**मुखेड / प्रतिनिधी**



भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राने सर्पदंश प्रतिबंध व नियंत्रण राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यासाठी राष्ट्रीय तांत्रिक सल्लागार समिती स्थापन केली असून, या समितीत मुखेड येथील प्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. दिलीप पांडुरंगराव पुंडे यांची निवड करण्यात आली.

या निवडीमुळे मुखेडसह संपूर्ण नांदेड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. या गौरवपूर्ण निवडीच्या निमित्ताने नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते मुखेड येथे डॉ. पुंडे यांच्या निवासस्थानी त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खासदारांच्या सुविद्य पत्नी सोनिया चव्हाण, ॲड. बळवंतराव बेटमोगरेकर, बाबुराव कदम बिल्लाळीकर, बालाजी बेटमोगरेकर, राजवंश चव्हाण यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ. दिलीपराव पुंडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पुंडे हॉस्पिटलच्या वतीने खा. रवींद्र चव्हाण व सोनिया चव्हाण यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी खा. चव्हाण म्हणाले की, ग्रामीण भागात अत्यंत मर्यादित साधनसामग्रीमध्ये काम करत असताना डॉ. दिलीप पुंडे यांनी सर्पदंशासारख्या गंभीर विषयावर केलेले कार्य अतिशय उल्लेखनीय आहे. त्यांच्या वैद्यकीय सेवेमुळे अनेक रुग्णांना जीवनदान मिळाले आहे. भारत सरकारने त्यांच्या कायाचीं दखल घेत राष्ट्रीय स्तरावरील समितीत त्यांची निवड करून मुखेडच्या भूमीचा सन्मान केला आहे. ही केवळ डॉ. पुंडे यांची नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याची अभिमानाची बाब आहे.

# अखिल भारतीय पेशवा संघटनेतर्फे ब्राह्मण समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## दहावी-बारावीतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांकडून मार्गदर्शन

**परभणी / प्रतिनिधी**



अखिल भारतीय पेशवा संघटनेच्या वतीने ब्राह्मण समाजातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ १७ मे रोजी वैष्णवी मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एन.आर. फार्माचे माजी सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून परळीचे नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, अखिल भारतीय पेशवा संघटनेचे सचिन वाडे, योगेश धर्माधिकारी, छत्रपती संभाजीनगर जिल्हाप्रमुख रविंद्र पंडित, जिल्हा सचिव दीपक कासांडे, नंदूकाका परांडकर, प्रा. संतोष कुलकर्णी, प्रसाद वाघमारे, अनिरुद्ध काटे, फिजिक्सवाला पाठशाळा क्लासेसचे प्रा. गगनदीप, प्रणय महाजन, बालाजी शारूक, पार्थ वाडे पाटील आदी उपस्थित होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच, विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत करिअरविषयक मार्गदर्शन करण्यात आले. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना समाजाच्या वतीने आर्थिक मदत करण्याचे आश्वासनही यावेळी देण्यात आले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वंभर काठवटे यांनी केले, तर प्रास्ताविक सचिन वाडे पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन अखिल भारतीय पेशवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिपक कासांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिपक कासांडे, नंदकुमार परांडकर, सुशील नर्सीकर, योगेश जोशी, प्रदीप जोशी, नागनाथ नरळदकर, रोहित कनकदंडे, विशाल जोशी, आनंद रामपूरकर आदींनी परिश्रम घेतले.

# आकांक्षा आर्गे हिचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**धर्माबाद / प्रतिनिधी**



राज्य परीक्षा परिषद पुणेतर्फे घेण्यात आलेल्या पि.यु.पि. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षांचा निकाल १८ मे जाहीर करण्यात आला. यावेळी धर्माबाद शहरातील इंदिरा गांधी पब्लिक शाळेत शिक्षण घेत असलेल्या आकांक्षा आर्गे या विद्यार्थिनीने घवघवीत यश मिळवून शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झाली आहे.

तालुक्यातील येताळा येथील रहिवासी असलेले सामाजिक सलोखा जपणारे व्यक्तीमत्व माजी ग्रामपंचायत सदस्य तथा इंदिरा गांधी पब्लिक शाळेचे सचिव नरसन्ना नागन्ना आर्गे यांची नात आकांक्षा अशोक आर्गे हि इंदिरा गांधी शाळेत ८ वर्गात शिक्षण घेत असताना राज्य परिक्षा परिषद पुणेतर्फे घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परिक्षेत ५९.७३ टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे. आकांक्षा हिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत असून यशाचे श्रेय इंदिरा गांधी पब्लिक शाळेचे शिक्षक व यशोदीप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे शिक्षक अजय सूर्यवंशी, रामपुरे यांना जाते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विठ्ठलरेड्डी कोपलोडे, उपाध्यक्ष शेटपलोड नरसारेड्डी, खजिनदार मुधोळकर राजेश्वर, संचालक गडमोड रामारेड्डी, सामोड गांगारेड्डी, येंगलोड गांगरेड्डी, प्रशासक सामोड नरसारेड्डी गंगारेड्डी, राजुरेड्डी गडमोड, मुख्याध्यापक संगीता पाटील, सरपंच तुळशीराम यंगलोड, माजी सभापती रामकिशन एगलोड, तंटामुक्ती अध्यक्ष चंद्रशेखर बारदवार, सामाजिक कार्यकर्ते कैलास चंदोड, प्रसिध्द मार्केट व्यापारी दिगु सुर्यवंशी, लक्ष्मण सुर्यवंशी यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

# मुक्रमाबाद येथील रहिवासी डॉ. रुखसाना शेख यांची जागतिक स्तरावर झेप

**मुक्रमाबाद / प्रतिनिधी**



येथील रहिवासी असलेल्या व सध्या छत्रपती संभाजीनगर येथील बी.एड. कॉलेजला प्राचार्य म्हणून कार्यरत असलेले डॉ. शेख रुखसाना अजीजसाब यांनी व त्यांच्या सहकारी गटाने दृष्टीहीन, श्रवणदोष असलेले व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विकसित केलेल्या फोल्डेबल मल्टी - सेन्सर इंटरॅक्टिव्ह लर्निंग असिस्टिव्ह डिव्हाइस सिस्टीम या उपकरणाला यू.के. पेटंट कार्यालयाकडून मान्यता मिळाली आहे.

संबंधित उपकरणाद्वारे दृष्टीहीन, श्रवणदोष व विशेष गरजा असलेले विद्यार्थी पाहणे, ऐकणे आणि स्पर्श करणे या तिन्ही माध्यमांतून अध्ययन करू शकतात, सदरील उपकरण हे विशेष शाळा व विशेष बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी उपयुक्त आहे. हे उपकरणाची सहजपणे घडी घालता येते त्यामुळे हे वापरण्यात अत्यंत सुलभ आहे. तसेच, प्रवासामध्ये सहजपणे घडी घालून लहान आकारामध्ये ठेवता येते. मुक्रमाबाद सारख्या एका खेड्यापासून ते जागतिक स्तरापर्यंत मारलेल्या या झेपामुळे त्यांच्यावर त्यांचे कुटुंबीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हे उपकरण विकसित करण्यामध्ये डॉ. शेख रुखसाना अजीजसाब यांच्या व्यतिरिक्त डॉ. शेख सुभान हसन, डॉ. बाळासाहेब किलचे, डॉ. योगेंद्र कुमार पवार, डॉ. अमरदीप असोलकर, डॉ. मीनाक्षी पाटील व डॉ. शुभांगी पाटील यांचा सहभाग आहे.

# पाथरीतील दुचाकीस्वाराचा ट्रकने दिलेल्या धडकेत मृत्यू



## रुढी पाटीजवळील दुर्देवी घटना

**परभणी / प्रतिनिधी**

परभणी ते पाथरी या राष्ट्रीय महामार्गावर रुढी पाटीजवळ एका मालवाहू ट्रकने दिलेल्या पाथरीतील स्वप्निल मानवतकर यांचा मृत्यू झाला. ही दुर्देवी घटना मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास घडली.

मानवतकर हे एम.एच. २२ बी. १६६२ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन परभणीहून पाथरीकडे जात होते. त्यावेळी रुढी पाटीजवळील एका जिनिंगसमोर भरधाव वेगाने मानवतहून परभणीकडे जाणाऱ्या एम.एच. १२ एन.एक्स १७८९ या क्रमांकाच्या मालवाहू ट्रकने त्यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. त्यात मानवतकर हे जागीच मृत्यू पावले. प्रत्यक्षदर्शनींनी घटनास्थळी धाव घेऊन ट्रकचालकास ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्या चालकाने तो ट्रकसह घटनास्थळावरुन पोबारा केला. दरम्यान, पाथरी येथील प्रसिध्द वैद्यकीय व्यवसायिक श्रीकांत मानवतकर यांचे स्वप्निल मानवतकर हे सुपूत्र होते. त्यांच्या या दुर्देवी निधनाने पाथरीत मोठी शोककळा पसरली.

## पान १ वरून

### विदर्भाला उष्णतेचा तडाखा, राज्यात अनेक ठिकाणी अलर्ट

पारा ४५ अंशांच्या पार गेला आहे. अशातच आता हवामान विभागाने आणखी काही दिवस राज्यात विशेषतः विदर्भात पारा चढलेलाच असणार असा अंदाज व्यक्त केला आहे.

आता प्रतिचक्रवाती परिस्थितीमुळे सर्वसाधारणपणे तापमान वाढताना दिसतं. पण आता तशी परिस्थिती नाही. विदर्भाचे जे रिजन आहे, तिकडे आद्रतेचे प्रमाण कमी झाले आहे. आकाश निरभ्र आहे. अशा परिस्थितीत सूर्यकिरण जास्त तीव्रतेने येतात. हे एक कारण तापमानवाढीसाठी आहे'', अशी माहिती हवामान तज्ज्ञ सानप यांनी दिली.दक्षिण महाराष्ट्रातील एक-दोन जिल्ह्यांसाठी वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यामध्ये कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यांचा समावेश आहे. या तीन जिल्हे वगळता इतर ठिकाणी असा कोणता इशारा नाही'', अशी माहिती डॉ. एस. डी. सानप यांनी दिली. ''दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात जे काही वातावरण आहे, तशीच परिस्थिती असण्याची शक्यता आहे.

### पेपरफुटी प्रकरण : अंबाजोगाईतील शिक्षिका आईसह बहीण-भावाची सीबीआय कडून चौकशी

धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. चौकशीदरम्यान विद्यार्थ्यांच्या शिक्षिका असलेल्या आईलाही प्रश्न विचारण्यात आल्याने तपासाची व्याप्ती वाढल्याचे दिसून येत आहे.

पेपरफुटी प्रकरणाच्या तपासामुळे चर्चेत आलेल्या लातूरमधील कोचिंग क्लासेसमध्ये आता विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे मुख्य संचालक म्हणून ओळखला जाणारा शिवराज मोटेगावकर सध्या सीबीआय च्या ताब्यात असताना, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी संस्थेकडून प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे. नीट परीक्षा पुन्हा घेण्यात येणार असून त्याबाबत विद्यार्थ्यांमधील असलेला संभ्रम लक्षात घेऊन आरसीसी च्या नियोजन समितीने सराव परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मोठ्या संख्येने विद्यार्थी कॅम्पसमध्ये दाखल झाले आहेत. परीक्षा पद्धतीनुसार त्यांची तयारी करून घेतली जात आहे.

### रिकव्हरी एजन्सीज आरबीआयच्या नियंत्रणात ?

आता जास्तीत जास्त एजन्सीज आरबीआयच्या थेट देखरेखीखाली येणार आहेत.

ग्राहकांची गोपनीयता जपली जाणार

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, एजंट ग्रहाकाच्या मोबाईलमधील खाजगी डेटा एक्सेस करू शकणार नाहीत. फोटो, कॉन्टॅक्ट लिस्ट यांसारख्या खाजगी माहितीचा वापर ते करू शकणार नाहीत. तसेच जोपर्यंत मोबाईल फोन बँकेने फायनान्स केलेला नसेल, तोपर्यंत बँकेला ग्राहकाच्या मोबाईलच्या सुविधा ब्लॉक करता येणार नाहीत. जर ग्राहकाने वसुली प्रक्रियेबाबत तक्रार केली, तर बँकेला तात्काळ वसुली थांबवावी लागेल. तक्रारीचे निवारण होईपर्यंत पुढील कारवाई करता येणार नाही. तसेच, रिकव्हरी दरम्यान होणाऱ्या सर्व संभाषणांचे रेकॉर्डिंग ठेवणे बँकांसाठी बंधनकारक असेल. यामुळे ग्राहकांचे हित सुरक्षित राहिल.

### धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा

मागण्यात आला आहे.

नीट यूजी परीक्षा ३ मे रोजी पार पडली होती. त्या परीक्षेचा पेपर फुटल्याने परीक्षा रद्द करण्यात आली आहे. आता नीट यूजी परीक्षा २१ जून रोजी आयोजित करण्यात आली आहे. परीक्षेतील गोंधळावरुन लोकसभेतील विरोधीपक्षनेते राहुल गांधी यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला जाणार नसेल तर त्याची जबाबदारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घ्यावी, असे राहुल गांधी म्हणाले होते. आता कॉकरोच जनता पार्टीने देखील धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

एक्स खाते बंद, इन्स्टाग्रामवर जोरदार प्रतिसाद

कॉकरोच जनता पार्टीचे एक्स खाते भारतात बंद करण्यात आल्यानंतर अभिजीत दीपके यांच्याकडून नवे खाते सुरु करण्यात आले आहे. नव्या खात्याला देखील चांगला प्रतिसाद एक्स प्लॅटफॉर्मवर मिळत आहे. इन्स्टाग्रामवर कॉकरोच जनता पार्टीच्या फॉलोअर्सची संख्या वेगाने वाढत आहे. इन्स्टाग्रामवर कॉकरोच जनता पार्टीच्या फॉलोअर्सची संख्या १६ मिलियन्सवर पोहोचली आहे. म्हणजेच फॉलोअर्सची संख्या १ कोटी ६० लाखांवर पोहोचली आहे.

### अण्णासाहेब पाटील महामंडळासाठी १५० कोटी

देण्याची प्रक्रिया राबवली जाते. संबंधित निधीचा वापर आणि खर्चाचा अहवाल शासनाकडे सादर केल्यानंतर पुढील टप्प्यातील निधी मंजूर केला जातो. याआधीही ३०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला होता. आता नव्याने १५० कोटी रुपयांची भर पडली आहे.

### पुलवामा हल्ल्याचा मास्टरमाइंड ठार

वाढवण्यात आली आहे. मात्र, हल्लेखोरांची ओळख आणि या हल्ल्यामागचे नेमके कारण काय, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

# कंधार येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा सुशोभीकरणाचे भूमिपूजन

## राजकीय खेळीनंतर जैसे थे, जागेवरच पडदा ; कंधार-लोहा मतदार संघात पुतळ्याचे राजकारण

**कंधार / प्रतिनिधी**

कंधार येथे अखेर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरणाचे भूमिपूजन आमदार प्रताप चिखलीकर यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, नगरसेवक; स्वप्निल लुंगारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मात्र, या सुशोभीकरण आणि पूर्णकृती पुतळ्याच्या मागे दोन वर्षांचा संघर्ष, आंदोलने, राजकीय उलाथापालथ आणि चिखलीकर यांची यशस्वी ठरलेली राजकीय खेळी याचीच चर्चा आता तालुक्यात रंगली आहे. ना अतिक्रमण पाडले गेले, ना पुतळ्याचे स्थलांतर झाले. शेवटी आहे त्याच जागी पुतळा ठेवून हा वाद संपवण्यात राजकीय नेत्यांना यश आले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा मुख्य दर्शनी भागात यावा, यासाठी सकल मातंग समाजाच्या वतीने दोन वर्षांपूर्वी तीव्र आंदोलन छेडण्यात आले होते. पुतळ्याच्या अगदी समोर कंधार नगर परिषदेचे अनधिकृत व्यापारी संकुल उभे आहे . रस्ता रुंदीकरणामध्ये हे संकुल अतिक्रमण म्हणून ग्राह्य धरण्यात आले होते. हे व्यापारी संकुल पाडून पुतळा मोकळ्या व दर्शनी भागात आणण्यात यावा, अशी समाज बांधवांची मागणी होती. यासाठी रास्ता रोको, आमरण उपोषण आणि थेट उच्च न्यायालयापर्यंत कायदेशीर लढाई देखील लढण्यात आली होती.



### चिखलीकरांची खेळी अन् आंदोलकांत उभी फूट

पुतळा स्थलांतराच्या या निर्णयावरून आमदार चिखलीकर आणि तत्कालीन नगराध्यक्ष नळगे यांच्या राजकीय व्यूहरचनेमुळे आंदोलकांमध्ये अचानक दोन गट पडले. एक गट पुतळा मंजूर झालेल्या नवीन जागेवर स्थलांतरित करण्यास अनुकूल होता. तर दुसरा गट पुतळा स्थलांतरित केल्यास थेट आत्मदहनाचा इशारा देणारा होता. यापूर्वी स्थलांतरित जागेच्या उद्घाटनासाठी आमदार चिखलीकर यांना बोलावण्यात आले होते. मात्र, समाज बांधवांच्या एका गटाने आत्मदहनाचा इशारा दिल्यामुळे चिखलीकर यांना तो कार्यक्रम तडकाफडकी गुंडाळावा लागला होता. त्यानंतर काही काळ हे प्रकरण जैसे थे स्थितीत राहिले आणि पुतळा आडोशालाच राहिला.

### चिखलीकर यांच्या खेळीची चर्चा

आमदार चिखलीकर यांनी याच निधीतून अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. मात्र, हा निधी पुतळा आहे त्याच (आडोशाच्या) जागेवर सुशोभीकरण करण्यासाठी वापरण्यात आला. परिणामी, समाज बांधवांनी ज्या मागण्यांसाठी न्यायालय आणि रस्त्यावर संघर्ष केला, त्यातील ना अतिक्रमण पाडले गेले, ना पुतळ्याचे मोकळ्या जागेत स्थलांतर झाले. चिखलीकर यांनी खेळलेल्या राजकीय खेळीमुळे आंदोलकांचे समाधानही झाले आणि नेत्यांची दुकानेही सुरक्षित राहिली, अशीच चर्चा आता कंधारकरांमध्ये सुरू आहे.

### राजकीय वरदहस्त अन् प्रशासकीय पेच

या व्यापारी संकुलात अनेक बड्या राजकीय नेत्यांची दुकाने असल्यामुळे हे अतिक्रमण पाडण्यास तीव्र विरोध होत होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने न्यायालयाच्या निर्देशानंतर दुकानदारांना अतिक्रमणाच्या नोटीस दिल्या, परंतु राजकीय वरदहस्तामुळे ही दुकाने पाडण्याचे धाडस प्रशासन दाखवू शकले नाही. दरम्यानच्या काळात, तत्कालीन तहसीलदार राम बोरगावकर यांनी यावर सुवर्णमध्य काढत तहसील कार्यालयाच्या समोर दर्शनी भागात पुतळा स्थलांतरित करण्यासाठी जागा मंजूर केली होती.

### निवडणुकीची गणिते अन् आंदोलकांचे मतपरिवर्तन

कंधार नगर परिषदेच्या निवडणुका जवळ येताच राजकीय समीकरणे वेगाने बदलली. पुतळा स्थलांतराला विरोध करत आत्मदहनाचा इशारा देणारा आंदोलकांचा गट कालांतराने आमदार चिखलीकर यांच्या गोटात सामील झाला. यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार चिखलीकर यांनी विजय मिळवला. आमदार झाल्यानंतर त्यांनी शहरातील विविध चौक आणि पुतळ्यांच्या सुशोभीकरणासाठी विशेष निधी मंजूर करून आणला.

# खरीप हंगामापूर्वी किनवट तालुक्यातील ५०३ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा

### २ हजार २५९ शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन अनुदान मिळण्याची शक्यता

**किनवट / प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत तालुक्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांच्या कर्जमाफी प्रक्रियेला वेग आला असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ५०३ सभासद शेतकऱ्यांना या योजनेचा थेट लाभ मिळणार आहे. तसेच, नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या २ हजार २५९ शेतकऱ्यांनाही प्रोत्साहन अनुदान मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.

सहाय्यक उपनिबंधक कार्यालयामार्फत शासनाकडे आवश्यक माहिती सादर केली असून, तालुक्यातील १०४ विविध कार्यकारी सहकारी संस्थांपैकी ४० संस्था थकबाकीदार नसल्याने वगळण्यात आल्या आहेत. उर्वरित ६४ संस्थांमधील पात्र शेतकऱ्यांची यादी अंतिम करण्यात आली आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार या ६४ संस्थांतील ५०३ थकबाकीदार शेतकऱ्यांकडे एकूण ३ कोटी ८७ लाख ३८ हजार ३४८ रुपयांची थकबाकी आहे. त्यामध्ये २ कोटी ९८ लाख ९५ हजार ५६१ रुपये मूळ कर्जरक्कम असून, ८८ लाख ४२ हजार ७८७ रुपये व्याजाचा समावेश आहे. दुसरीकडे, तालुक्यातील ८५ विविध कार्यकारी सहकारी संस्थांमधील नियमित कर्जफेड करणाऱ्या २ हजार २५९ शेतकऱ्यांनी तब्बल १८ कोटी ९३ लाख १९ हजार रुपयांचे पीककर्ज वेळेत परत केले आहे. या रकमेवर आधारित पात्र शेतकऱ्यांना शासनाकडून कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कर्जमाफी व प्रोत्साहन अनुदानासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत माहिती संकलन मोहीम राबविण्यात आली होती. पात्र लाभार्थ्यांची माहिती पडताळून शासनाच्या पोर्टलवर अपलोड केली असून, माहिती संकलनाची प्रक्रिया पूर्ण झाल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा होणार

**दरम्यान, कर्जमाफीचा** लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण अनिवार्य करण्यात आले आहे. लाभार्थी शेतकऱ्यांनी आधार क्रमांक बँक खात्याशी जोडणे तसेच ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने सांगितले. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा होणार आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, उर्वरित प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून खरीप हंगामापूर्वीच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम जमा करण्यासाठी शासनस्तरावर हालचाली सुरू आहेत.

# खरीप पीक विम्याची प्रतीक्षा कायम; बिलोली-कुंडलवाडीचे शेतकरी संतप्त

### दोन दिवसांत रक्कम न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**बिलोली / प्रतिनिधी**

हंगामात सोयाबीनच्या झालेल्या अतोनात नुकसानीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या बिलोली आणि कुंडलवाडी मंडळातील शेतकऱ्यांना अद्याप २०२५ चा खरीप पीक विमा मिळाला नसल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. बिलोली तालुक्यातील इतर सर्व मंडळांना विम्याचा लाभ मिळाला असताना, केवळ या दोन मंडळांनाच का डावलण्यात आले, असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, खरीप २०२५ चा पीक विमा मंजूर झाला आहे. मात्र, प्रशासकीय अनास्थेमुळे ही रक्कम अजूनही शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झालेली नाही. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे सोयाबीनचे पीक हातचे गेले असून शेतकरी पुरता कोलमडला आहे. त्यातच हक्काचा विमा अडकून पडल्याने त्यांच्यापुढील आर्थिक अडचणी अधिकच गडद झाल्या आहेत. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी बिलोली मंडळातील सर्व शेतकऱ्यांच्या वतीने सरपंच रुक्मिणबाई माकुतवार यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय बिलोली यांना अधिकृत निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी आणि देगलूर-बिलोली मतदारसंघाच्या आमदारांनाही पाठवण्यात आल्या आहेत.



### प्रशासनाचा तीव्र निषेध


''येत्या दोन ते तीन दिवसांत विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली नाही, तर नाईलाजास्तव प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,'' असा स्पष्ट आणि निर्वाणीचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. या निवेदनावर गणेश पाटील बोडके, राजिन्ना बाबुराव कांपिलवार, गंगाधर विठ्ठल शिरगिरे, धोंडिबा रामचंद्र प्याटेकर, मोहम्मद बाबुमिया यांच्यासह शेकडो त्रस्त शेतकऱ्यांनी स्वाक्षऱ्या करून प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला आहे. आता प्रशासन यावर काय पाऊल उचलते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# जीवन मांजरमकर यांना ग्रंथालय चळवळ, रणजीत गोणाकर यांना शैक्षणिक पुरस्कार जाहीर

### १४ जुन रोजी आंबेडकरवादी साहित्य संमेलन नांदेड येथे वितरण

धर्माबाद / प्रतिनिधी

सत्यशोधक विचार मंच आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कामगार कर्मचारी युनिट (रोपे महोत्सव वर्ष) यांच्या संयुक्त विद्यमाने फुले, शाहू ,आंबेडकर, साठे-वामनदादा कर्डक प्रेरणेच्या २१व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे आयोजन १४ जून २०२६ रोजी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह नांदेड येथे केले असून या साहित्य संमेलनात सामाजिक, धार्मिक कार्यात नेहमी उल्लेखनीय कार्य करणारे





जीवन मांजरमकर यांना उत्कृष्ट ग्रंथालय चळवळ पुरस्कार तर गोणार नगरीचे भुमिपुत्र रणजीत शामराव गोणारकर यांना शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट पुरस्कार जाहीर केला असून १४ जुन रोजी नांदेड येथे प्रदान करण्यात येणार आहे.

जीवन मांजरमकर हे गेल्या अनेक वर्षांपासून ग्रंथालय चळवळीमध्ये सक्रियपणे कार्यरत असून, त्यांच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी त्यांनी ''वाचन कट्टा'' यासारख्या उपक्रमांद्वारे कविसंमेलन, व्याख्यानमाला, ग्रामीण साहित्य संमेलन तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा ''जीवन गौरव'' व ''युवा जीवन गौरव'' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ग्रामीण भागात वाचन संस्कृती वाढविण्यासाठी तसेच सामाजिक प्रबोधनासाठी त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन उत्कृष्ट ग्रंथालय चळवळ पुरस्कार जाहीर झाला आहे. उमरी तालुक्यातील कृष्णामाई विद्यामंदिर माध्यमिक बळेगाव येथील गुणवंत, होतकरू व उपक्रमशील शिक्षक रणजीत गोणाकर यांना शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार जाहीर झाला असून १४ जून रोजी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह नांदेड येथे होणाऱ्या २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्ष पुरोगामी विचारवंत प्रख्यात लेखक, पत्रकार संजय आवटे, संमेलनाचे उद्घाटक राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य प्रख्यात विचारवंत ॲड. गोरक्ष लोखंडे, कोल्हापूरचे खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, नांदेडचे खासदार प्रा. रवींद्र चव्हाण, जेष्ठ नाटककार दत्ता भगत, दंगलकार नितीन चंदनशिवे, प्रा. रविचंद्र हडसनकर, प्रा. जगदीश कदम, डॉ. विजय कदम व डॉ .जयवंतराव व्हटकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



## वार्ड क्रमांक दहामध्ये चार टँकरची सुविधा

मुखेड : शहरातील वार्ड क्रमांक दहामधील आरोग्य स्वच्छता नगरपालिका सभापती अंजली रोडगे, नगरपालिका पाणीपुरवठा सभापती विनोद दंडलवाड तथा भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष करण रोडगे यांनी स्व-खर्चाने वार्ड क्रमांक १० मधील जनतेसाठी कडकत्या उन्हामध्ये तहानेने व्याकूळ झालेल्या जनतेसाठी जलवाहिनी चार टँकरची सुविधा उपलब्ध करून जनतेची तहान भागवली. येथील नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहे.

### संजय गांधी निराधार योजनेच्या जाचक अटी ; हदगाव तहसील कार्यालयात वृद्धांची फरफट

# कधी शाळेत न गेलेल्या वृद्धांनी ५० वर्षांपूर्वीचे दाखले आणायचे कुठून?

**हदगाव / प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मिळणारे मानधन हे अनेक गरीब, वृद्ध आणि अपंगांच्या जगण्याचा मुख्य आधार आहे. मात्र, शासनाने नुकत्याच काढलेल्या एका नवीन जीआर (शासन निर्णय) मुळे या योजनेचे लाभार्थी अडचणीत आले आहेत.

नवीन नियमानुसार, वयाचा पुरावा म्हणून आता केवळ जन्म प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला अनिवार्य करण्यात आला आहे. शासनाच्या या जाचक अटीमुळे तालुक्यातील संपूर्ण हजारो निराधार वृद्ध नागरिक योजनेपासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. यापूर्वी संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या वयाचा पुरावा म्हणून शासकीय डॉक्टरांचे वय प्रमाणपत्र ग्राह्य धरले जात होते. ग्रामीण भागातील बहुतांश वृद्ध नागरिक हे अशिक्षित असल्याने ही पद्धत त्यांच्यासाठी अत्यंत सोयीची होती. मात्र, नव्या नियमाने या सुलभ प्रक्रियेला ब्रेक लावला आहे. हदगाव तालुक्यासह ग्रामीण भागातील हजारो वृद्ध नागरिक असे आहेत जे कधी शाळेतच गेले नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे शाळा सोडल्याचा दाखला असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. दुसरीकडे, ५० ते ६० वर्षांपूर्वी ग्रामीण भागात जन्माच्या नोंदी ठेवण्याची कोणतीही ठोस व्यवस्था किंवा जागृती नव्हती. अशा परिस्थितीत, ज्यांच्या जन्माची नोंद नाही आणि जे कधी शाळेत गेले नाहीत, त्यांनी वयाचा पुरावा म्हणून नेमके कोणते कागदपत्र सादर करायचे ?असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.




### शासन कागदपत्रांच्या जाचात अडकवत असल्याचा आरोप

हदगाव तहसील कार्यालयात वृद्धांची फरफट आज हदगाव तहसील कार्यालयात या योजने संदर्भात आलेल्या अनेक वृद्ध नागरिकांनी आपली व्यथा मांडली. हलाखीची परिस्थिती, त्यात उतारवय आणि सोबतीला कागदपत्रांची जुळवाजुळव करताना होणारी धावपळ यामुळे या वृद्धांचे अतोनात हाल होत आहेत. हा प्रश्न केवळ एका तालुक्याचा नसून संपूर्ण महाराष्ट्रातील लाखो गरीब आणि निराधार वृद्धांचा गंभीर प्रश्न बनला आहे. गरीब आणि निराधारांना आर्थिक आधार देण्याऐवजी शासन त्यांना कागदपत्रांच्या जाचात अडकवत असल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे.

### पूर्वीची पद्धत लागू करण्याची ठाम मागणी

या गंभीर समस्येची दखल घेत, शासनाने या योजनेसाठी लावलेली जन्म प्रमाणपत्र आणि शाळा सोडल्याच्या दाखल्याची सक्ती तात्काळ रद्द करावी, अशी ठाम मागणी केली जात आहे. निराधारांना दिलासा देण्यासाठी पूर्वीप्रमाणेच शासकीय डॉक्टरांचे वय प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे, अन्यथा याविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

## महासत्तांचा त्रिकोण



अमेरिका आणि इस्रायलने इराणवर युद्ध लादल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चीनला मे महिन्यात भेट देऊन, त्या देशाचे अध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेणार होते. ट्रम्प यांची भेट लांबणीवर पडत गेली. अखेर त्यांनी १४ व १५ मे २०२६ असे दोन दिवस चीनला भेट दिली. जागतिक राजकारणाच्या दृष्टीने ही भेट महत्त्वाची होती. शी जिनपिंग यांनी ट्रम्प यांना तैवानच्या बाबतीत चीनची भूमिका स्पष्ट केली. इराण युद्धावर या भेटीत चर्चा झाली; परंतु त्यातून फारसे काही साध्य झाले नाही. कोणी काही म्हटले, तरी चीन हा रशियाचा मित्र आहे, तर आपल्या भारताच्या दृष्टीने शत्रू! अमेरिका एक महासत्ता आहे, तर चीनही महासत्ता आहे. भारतालाही महासत्ता बनण्याचे वेध लागलेले असले, तरी ट्रम्प आणि जिनपिंग यांनी जागतिक स्तरावर ग्रुप ऑफ टू नेशन्स म्हणजेच जी-२ ची स्थापना केली आहे. भारतासाठी ही गोष्ट निश्चितपणे चिंतेची आहे. जागतिक अस्थिरता असताना दोन नेत्यांची शिखर परिषद पार पडली, पण त्यांनी आपापल्या हितांवर अधिक लक्ष केंद्रित केले. जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इराण युद्धाचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी होता. दोन्ही नेत्यांनी इराणकडे अण्वस्त्रे असू नयेत आणि आंतरराष्ट्रीय तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली 'होर्मुझची सामुद्रधुनी' खुली ठेवली जावी, यावर चर्चा केली. ही चर्चा अपेक्षित होतीच. सामुद्रधुनीत अमेरिकन नाकेबंदीसह सर्व युद्धजन्य परिस्थिती थांबवण्याची गरज जिनपिंग यांनी व्यक्त केली. याचा अर्थ, आता युद्ध थांबवा, असे जिनपिंग यांनी ट्रम्प यांना स्पष्टपणे सांगितले. तैवानच्या स्वातंत्र्याबाबत शी जिनपिंग यांनी ट्रम्प यांना स्पष्ट शब्दांत इशारा दिला. तैवान हा चीनचा अधिकृत भाग असल्याचा दावा चीनचे सर्वच अध्यक्ष आतापर्यंत करत आले आहेत. आपण राष्ट्राध्यक्ष असेपर्यंत चीन तैवानवर लष्करी कारवाई करणार नाही, असा दावा ट्रम्प यांनी केला. मात्र, तैवानने स्वतःला स्वतंत्र देश घोषित करू नये, अशी चीनची मुख्य अट आहे. जिनपिंग यांनी तैवानबाबत ट्रम्प यांच्यासमोर आपली भूमिका स्पष्ट केली. तैवानच्या मुद्द्यावरून जिनपिंग यांनी ट्रम्प यांना दोन शब्द सुनावले. अधोगती सुरू असलेला देश, अशा शब्दांमध्ये जिनपिंग यांनी अमेरिकेचा उल्लेख केला. इराण युद्धाच्या दगडाखाली अमेरिकेचे हात अडकलेले असल्याचे पाहून जिनपिंग यांनी ट्रम्प यांना फार किंमत दिली नाही. चीन महासत्ता आहे, ही वस्तुस्थिती ट्रम्प यांना स्वीकारावी लागली आहे. 'होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणे आवश्यक आहे', यावर दोन्ही नेत्यांचे एकमत, एवढीच ट्रम्प यांच्या बीजिंग दौऱ्याची फलश्रुती आहे. ट्रम्प चीनमधून परत गेले असतानाच रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी चीनला भेट दिली. पुतिन यांनी १९ व २० मे २०२६ असा दोन दिवसांचा अधिकृत चीन दौरा केला. त्यांनी जिनपिंग यांच्यासोबत चर्चा केली. द्विपक्षीय संबंध, जागतिक राजकारण आणि ऊर्जा क्षेत्रातील सहकार्याबाबत सविस्तर चर्चा झाली आणि महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. रशियाकडून चीनला नैसर्गिक वायूचा पुरवठा करण्यासाठीच्या पॉवर ऑफ सायबेरिया-२ या गॅस पाइपलाइन प्रकल्पावर चर्चा झाली. मध्यपूर्व आणि इराणमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर रशियाने चीनला सुरक्षित ऊर्जा पुरवठादार म्हणून सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यासाठी जवळपास ४० करारांवर आणि एका व्यापक संयुक्त विधानावर स्वाक्षऱ्या करण्याचे दोन्ही देशांनी निश्चित केले. यात शिक्षण, व्यापार आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्याचा समावेश आहे. जगात वाढणाऱ्या एकतर्फी हुकूमशाहीला म्हणजे ट्रम्प यांना विरोध करत रशिया आणि चीनने अधिक न्याय्य आणि समान जागतिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी एकत्र काम करण्याचे ठरवले. पुतिन यांनी रशिया-चीन संबंध अभूतपूर्व पातळीवर पोहोचले असल्याचे म्हटले, तर चीन-रशिया मैत्री चिरस्थायी असल्याचे जिनपिंग यांनी म्हटले. चीन-अमेरिका यांनी एकीकडे जी-२ ची स्थापना केली असताना, चीनने रशियाशी अधिक जवळीक साधली. रशिया आणि इराण मित्र आहेत. होर्मुझ सामुद्रधुनी इराणने रशियासाठी खुली ठेवली आहे. दुसरीकडे, रशिया चीनला इंधनपुरवठा सुरूच ठेवणार आहे. चीनने दोन्ही बाजूंनी आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला. जी-२ भारतासाठी चिंताजनक आहे. इराणने भारतासाठी सामुद्रधुनी खुली ठेवली असली, तरी अमेरिकेच्या दबावामुळे भारताला रशियाकडून इंधन घेण्याच्या मर्यादा आहेत. जिनपिंग, ट्रम्प आणि पुतिन या तीन शक्तिशाली नेत्यांमध्ये भारताची कोंडी होणार नाही, याकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष द्यावे लागेल. जिनपिंग भारताच्या राशीला नाहीत, तर ट्रम्प यांच्यावर भरवसा ठेवता येत नाही. पुतिन यांचा रशिया आपला पारंपरिक आणि जुना मित्र आहे. हीच समाधानाची बाब म्हणता येईल. युक्रेन युद्धापासून रशियावरील पाश्चात्त्य देशांच्या आर्थिक निर्बंधांनंतर चीन हा रशियन इंधनाचा सर्वांत मोठा खरेदीदार आहे. भारतही रशियाकडून स्वस्तात तेल खरेदी करत होता; परंतु अमेरिकन अध्यक्षांनी निर्बंध आणून भारत आणि रशियाची कोंडी केली. इराण युद्ध सुरू असताना अमेरिकेने भारताला मर्यादित काळात रशियन तेल घेण्याची मुभा दिली. पण त्यामुळे मोठ्या प्रमाणात इंधन घेता येत नाही. अमेरिका आणि रशियासमोर इंधनटंचाई नाही. चीनने इंधनटंचाईवर मात केली आहे. भारताचे तसेच प्रयत्न असले, तरी डॉलर महाग होत असल्याने परिस्थिती गंभीर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ट्रम्प यांची लवकरच भेट घेणार आहेत. अमेरिका, रशिया आणि चीन या तीन शक्तिशाली देशांच्या त्रिकोणात भारत अडकून पडणार नाही, याकडे लक्ष देणे अपरिहार्य आहे.

# भारताला आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात नेणारे 'राजीव'

२१ मे १९९१ ची ती रात्र गांधी कुटुंबीय आणि देशासाठी काळरात्र ठरली. तामिळनाडूमध्ये श्रीपेराम्बदूर येथे प्रचारसभेला जात असताना एक महिलेच्या कमरेला बांधलेल्या स्फोटकांचा आत्मघातकी हल्ला त्यांच्यावर झाला आणि एका 'राजीव'चा मृत्यू झाला. एलटीटीईच्या या हल्ल्याने देशाला हादरवून सोडले. भारताला आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात घेऊन जाणारा दूरदृष्टीचा नेता म्हणून (कै.) राजीव गांधी ओळखले जातात. फिरोज गांधी आणि इंदिरा गांधी यांचे ज्येष्ठ पुत्र असलेले तसेच डून स्कूल, ट्रिनिट्री कॉलेज (केंब्रिज), इम्पिरिअल कॉलेज (लंडन) यांसारख्या नामांकित शिक्षण संस्थांमधून शिक्षण घेतलेले राजीव गांधी पेशाने पायलट. माझे कुटुंब माझी जबाबदारी पार पाडणारे राजीव गांधी हे आपल्या संसारात कौटुंबिक आयुष्य जगत असतानाच अगदी अनपेक्षितपणे इंदिरा गांधी यांच्या निधनाने त्यांच्याकडे देशाचे नेतृत्व आले. त्यावेळी पंतप्रधान म्हणून प्रणव मुखर्जी यांचे नाव चर्चेत होते. पण नशीब राजीव गांधी यांच्या बाजूने होते. वयाच्या अवघ्या चाळिसाव्या वर्षी देशाचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. त्याअगोदर आपला लहान भाऊ संजय गांधी यांचे अपघाती निधन झाले होते. ते दुःख त्यांना पचवावे लागले.



इंदिरा गांधी यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने अब की बार चारसौ पार पलीकडे जागा मिळवल्या. आपल्या १९८४-८९ या कार्यकाळात त्यांनी आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविला, आधुनिक तंत्रज्ञानाचा भारत बनविण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान ही त्यांची सर्वांत मोठी उपलब्धी होती. दूरसंचार क्षेत्रात त्यांच्यामुळेच भारतात क्रांती झाली. त्यांच्या कार्यकाळात युवकांना मतदान करता यावे यासाठी २१ वर्षांची मर्यादा कमी करून १८ वर्षे करण्यात आली. भारतातील पंचायत राज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा मिळवून देण्यात आणि तिला बळकट करण्यात माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण करून लोकशाही थेट गावपातळीपर्यंत पोहोचवण्याचे त्यांचे स्वप्न होते. त्यामुळे एकविसाव्या शतकातील भारताचा निर्माता म्हणूनदेखील त्यांना ओळखले जाते. १९९१ साली त्यांना मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्कारदेखील देण्यात आला होता. राजीव गांधी यांना केवळ पाच वर्षे मिळाली. मात्र, त्यांनी संधीचे सोने केले. विरोधी पक्षनेते अटलबिहारी वाजपेयी यांना परदेशी उपचारांची गरज आहे, हे ओळखून त्यांनी अटलबिहारी वाजपेयी यांना

**अनंत बोरसे**
शहापूर

शिष्टमंडळाचे नेतृत्व देऊन परदेशी पाठवले. राजकीय मतभेद असले, तरी टोकाचे मनभेद कधीच बाळगले नाहीत. त्याचबरोबर केंद्रातून एक रुपया पाठवला तर खाली पंधरा पैसेच पोहोचतात, असे त्यांनी प्रांजळपणे कबूल केले होते. डिजिटल क्रांतीचा खरा पाया त्यांच्या काळात घातला गेला. जवाहर नवोदय विद्यालयाची स्थापना त्यांच्याच संकल्पनेतून करण्यात आली. महिला आरक्षणाबाबत त्यांनीच आग्रही भूमिका घेतल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू झाले.

बोफोर्स तोफा खरेदी व्यवहारात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करून त्यांच्या विरोधात रान उठवले गेले. विश्वनाथ प्रताप सिंह तर खिशातून कागद काढून खाते नंबर असल्याचे सांगत होते. याप्रकरणी त्यांचेही नाव गोवले गेले. मात्र, कालांतराने २००४ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांना क्लीन चिट दिली. २०११ मध्ये हा खटला बंद करण्याची परवानगी सीबीआयला देण्यात आली.

भारताने श्रीलंकेत शांतीसेना पाठवली, या रागातून श्रीलंकेत एकदा त्यांच्यावर हल्लादेखील झाला होता आणि अखेर एलटीटीईच्या आत्मघाती पथकाने त्यांची हत्या केली. विशेष म्हणजे, ज्यांनी राजीव गांधी यांना मारले त्या मारेकऱ्यांना मोठ्या मनाने माफ करण्याचा उदारपणा गांधी कुटुंबीयांनी दाखवला. देशविदेशात त्यांनी आपली छाप पाडली. राजबिंड व्यक्तिमत्त्व, सालस स्वभाव, कुटुंबवत्सल अशा राजीव गांधी यांच्या आयुष्याची अखेर मात्र एका बॉम्बस्फोटाने झाली. स्फोटानंतर त्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे झाले होते. ते दृश्य फारच विदारक होते. २१ मे १९९१ रोजी राजीव गांधी आपल्यातून निघून गेले. मात्र, भारतीयांच्या स्मृतीत ते अजूनही आहेत आणि भविष्यातही राहतील.

# दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाज ही काळाची गरज

भारतात २१ मे हा दिवस 'दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन' म्हणून पाळला जातो. हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील अत्यंत वेदनादायी घटनेची आठवण करून देणारा आहे. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूमधील श्रीपेराम्बुदूर येथे निवडणूक प्रचारसभेदरम्यान झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटात त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता. त्या घटनेनंतर भारत सरकारने समाजात दहशतवाद आणि हिंसाचाराविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी २१ मे हा दिवस 'दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचा उद्देश केवळ एका नेत्याच्या स्मृतींना अभिवादन करणे नाही, तर समाजात शांतता, बंधुता, सहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे, हा आहे. आजच्या अस्थिर आणि तणावपूर्ण जगात या दिवसाचे महत्त्व अधिक वाढलेले दिसते.



मानवजातीच्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असता संघर्ष, युद्धे आणि हिंसा यांचे अनेक संदर्भ आढळतात. प्राचीन काळात भूभाग विस्तारासाठी युद्धे केली जात होती. मध्ययुगात धर्माच्या नावाखाली रक्तपात झाला. आधुनिक युगात राष्ट्रवाद, आर्थिक विषमता, राजकीय स्वार्थ, धार्मिक कट्टरता आणि जातीयवादामुळे हिंसाचाराला खतपाणी मिळाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जगाला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेले असले, तरी मानवी मनातील द्वेष, सूडभावना आणि असहिष्णुता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. उलट आधुनिक तंत्रज्ञानामुळे दहशतवाद अधिक संघटित, आक्रमक आणि घातक बनला आहे. आज दहशतवादी संघटना इंटरनेट, सोशल मीडिया, आर्थिक नेटवर्क आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या मदतीने जगभरात भयाचे वातावरण निर्माण करत आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ एका देशापुरता मर्यादित प्रश्न राहिलेला नसून संपूर्ण मानवजातीसमोरील गंभीर आव्हान बनला आहे.

दहशतवाद म्हणजे राजकीय, धार्मिक, सामाजिक किंवा वैचारिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हिंसा, धमकी आणि भीतीचा वापर करणे होय. दहशतवादी संघटना समाजात अस्थिरता निर्माण करण्यासाठी निरपराध नागरिकांना लक्ष्य करतात. बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले, गोळीबार, अपहरण, रेल्वे किंवा विमानांवरील हल्ले, धार्मिक स्थळांवरील आक्रमणे आणि सायबर हल्ले अशा विविध मार्गांनी दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जातात. हिंसाचार ही केवळ शारीरिक हानीपुरती मर्यादित गोष्ट नाही. मानसिक, सामाजिक आणि वैचारिक स्तरावरही हिंसा घडू शकते. एखाद्याला धमकावणे, द्वेष पसरवणे, अफवा निर्माण करणे किंवा समाजात भीतीचे वातावरण तयार करणे हेही हिंसेचेच प्रकार आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ सुरक्षाव्यवस्थेचा

**डॉ. राजेंद्र बगाटे**
९९६०१०३५८२

प्रश्न नसून तो सामाजिक, मानसिक आणि नैतिक मूल्यांशी संबंधित गंभीर विषय आहे. भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला देश आहे. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य मानले जाते. मात्र, काही विघातक शक्तींनी या विविधतेचा गैरफायदा घेऊन देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने अनेक दहशतवादी घटनांचा सामना केला आहे. पंजाबमधील अतिरेकी चळवळी, जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, ईशान्य भारतातील फुटीरतावादी कारवाया, नक्षलवाद आणि महानगरांमधील बॉम्बस्फोट अशा अनेक घटनांनी देश हादरून गेला. १९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोट, २००१ मधील भारतीय संसदेवरील हल्ला, २००८ मधील मुंबईवरील २६/११ चा दहशतवादी हल्ला आणि पुलवामा हल्ला अशा घटनांमध्ये शेकडो निरपराध नागरिक, सैनिक व पोलिस शहीद झाले.

गरिबी, बेरोजगारी, अशिक्षण, सामाजिक अन्याय, धार्मिक कट्टरता, जातीय भेदभाव, राजकीय अस्थिरता आणि परकीय हस्तक्षेप ही दहशतवाद वाढण्याची प्रमुख कारणे मानली जातात. समाजातील काही युवक जेव्हा स्वतःला उपेक्षित समजू लागतात, तेव्हा त्यांच्या मनात असंतोष निर्माण होतो. काही अतिरेकी संघटना अशा युवकांना चुकीच्या मार्गाला लावतात. धर्म, राष्ट्रवाद किंवा स्वातंत्र्याच्या नावाखाली त्यांचे ब्रेनवॉश केले जाते. काही वेळा आर्थिक आमिष दाखवूनही युवकांना दहशतवादी कारवायांत सहभागी केले जाते. सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या माध्यमातून अतिरेकी विचारसरणीचा प्रचार केला जातो. त्यामुळे युवकांत विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावादी मूल्ये विकसित करणे आवश्यक आहे. दहशतवादी हल्ल्यांमध्ये निरपराध लोकांचे प्राण जातात, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि हजारो लोक मानसिक आघात सहन करतात. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू म्हणजे त्या संपूर्ण कुटुंबाचा आधार हरवणे होय. हिंसेमुळे समाजात भीती व अविश्वास वाढतो. लोक सार्वजनिक ठिकाणी जाण्यास घाबरतात. अनेक लोकांना दीर्घकाळ तणाव, नैराश्य आणि भीतीचा सामना करावा लागतो. दहशतवादाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही गंभीर परिणाम होतो. एखाद्या मोठ्या हल्ल्यानंतर पर्यटन, उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक यांवर विपरीत परिणाम होतो. सरकारला सुरक्षा व्यवस्थेसाठी प्रचंड खर्च करावा लागतो. विकासकामांसाठी वापरला जाणारा निधी सुरक्षेसाठी खर्च होतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग मंदावतो. दहशतवादी घटनांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची प्रतिमा प्रभावित होऊ शकते. त्यामुळे दहशतवाद हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून राष्ट्रीय विकासासाठीही मोठे आव्हान आहे.

## भटक्या कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर



सर्वोच्च न्यायालयाने कुत्र्यांना दयामरणाची परवानगी देताना, तसेच भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाचा निकाल न्यायालयाने कायम ठेवल्याचे वृत्त वाचले. सध्या उपनगरांतून, तसेच गल्लीबोळांतून भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. या भटक्या कुत्र्यांनी नागरिकांवर हल्ले करून त्यांना चावे घेण्याच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये एकप्रकारे कुत्र्यांनी दहशत निर्माण केली आहे. यावर उपाययोजना म्हणून सर्वोच्च न्यायालयाने पिसाळलेल्या कुत्र्यांना दयामरणाची परवानगी दिली आहे खरी. पण कुत्रा हा मुका प्राणी असल्याने त्याच्या परवानगीचा प्रश्नच उदभवत नाही. उलट कुत्र्यांना इंजेक्शन देऊन मारणे, हा क्रूरपणाचा कळस आहे, असे मत व्यक्त करून प्राणिप्रेमी संघटना आडव्या येण्याची शक्यता नाकारता येत नाही. मग अशावेळेस प्राणिप्रेमी संघटनांनी अशा भटक्या कुत्र्यांना स्वतःच्या घरी घेऊन जावे. त्यांना आसरा द्यावा. भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात महापालिकाही अनेक उपाययोजना करून थकली. उदा. भटक्या कुत्र्यांची रवानगी श्वानगृहात करून झाली. त्यांचे निर्बीजीकरण करून झाले. ज्यांचे निर्बीजीकरण झाले नाही त्यांचे काय? अशा कुत्र्यांना उपनगरे तसेच गल्लीबोळांतून शोधून काढणे हे आव्हानात्मक काम आहे. त्यांना तिथून हटवणे हेही सोपे काम नाही. तेव्हा न्यायालयाने कितीही उपाययोजना सुचवल्या तरीही त्यावर कायमस्वरूपी तोडगा निघेल, असे वाटत नाही.

**- गुरुनाथ मराठे**

## सिंधुदुर्गात साकारतेय भारतातील पहिले पाण्याखालील संग्रहालय

निसर्गसौंदर्य, ऐतिहासिक वारसा आणि सागरी पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सिंधुदुर्गनगरीत जागतिक दर्जाचा जलपर्यटन प्रकल्प आणि पाण्याखालील संग्रहालय, साकारले जात आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प देशातील सागरी पर्यटन क्षेत्राला नवे आयाम देणारा ठरणार आहे. भारतीय नौदलाची निवृत्त युद्धनौका आयएनएस गुलदार या युद्धनौकेचे रूपांतर समुद्राखालील अद्वितीय पर्यटन केंद्रात करण्यात येत आहे. त्यामुळे युद्धनौका पर्यटकांसाठी आकर्षणाचे प्रमुख केंद्र बनणार आहे. या ऐतिहासिक प्रकल्पामुळे सिंधुदुर्गातील पाणबुडी आणि सागरी पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. समुद्राच्या तळाशी विसावलेले हे अजस्त्र जहाज पाहण्यासाठी देश-विदेशातील स्कूबा डायव्हर्स आणि स्नॉर्कलर्स सिंधुदुर्गाकडे आकर्षित होतील. भारतात 'शिप रेक डायव्हिंग'चा हा एक अत्यंत दुर्मिळ आणि थरारक अनुभव ठरणार आहे. मालवणचा किल्ला, तारकर्लीचा समुद्रकिनारा आणि आता निवती समुद्रातील 'आयएनएस गुलदार' हे समीकरण सिंधुदुर्गाला आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जाणार आहे. या सागरी प्रकल्पामुळे विविध प्रजातींच्या माशांना राहण्यासाठी आणि प्रजननासाठी एक सुरक्षित जागा निर्माण होईल, ज्याचा फायदा स्थानिक मत्स्य व्यवसायाला होणार आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्यातील हॉटेल्स, होम-स्टे, बोट व्यावसायिक, स्कूबा गाईड्स आणि ट्रॅव्हल एजंट्स यांच्या व्यवसायात प्रचंड वाढ होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळणार आहे. बऱ्याच कालावधीनंतर मिळालेल्या या 'मुहूर्तामुळे' सिंधुदुर्गाच्या शाश्वत विकासाचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही!

**- राजू जाधव, मांगूर**

## अत्यंत निंदनीय आणि निषेधार्ह



लातूर येथील आरसीसी क्लासेसचा सर्वेसर्वा शिवराज मोटेगावकर याला 'नीट' पेपरफुटीसंदर्भात सीबीआयने अटक केल्यानंतर महाराष्ट्रात शैक्षणिक गुणवत्तेचा ब्रँड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'लातूर पॅटर्न'च्या प्रतिमेला मोठा धक्का बसला आहे. लातूरमधील कोचिंग क्लासेसच्या पारदर्शकतेला तडा गेल्याने पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमासह तीव्र संतापाचे वातावरण आहे. विशेष म्हणजे, 'नीट' पेपरफुटी घोटाळ्याचे धागेदोरे राज्यभर पसरले असून, याअनुषंगाने केंद्रीय अन्वेषण विभागाने नाशिक, पुणे, लातूर, नांदेड येथील काहींना अटक केली आहे. पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाची सूत्रे विदर्भापर्यंत पोहोचली असून, नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथील या घोटाळ्याशी संबंधित संशयित असलेल्या तीन विद्यार्थ्यांची झाडाझडती घेण्यात आली. ज्या महाराष्ट्राला देशातील प्रगतिशील, सुसंस्कृत, अग्रणी राज्य म्हणून ओळखले जाते आणि ज्या महाराष्ट्राला वारकरी संप्रदाय, नैतिक मूल्ये आणि संतांची महान परंपरा लाभली आहे, त्याच संतांच्या महाराष्ट्रात 'नीट'सारख्या देशव्यापी परीक्षेच्या पेपरफुटीचे प्रकरण समोर आल्याने महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेला काळिमा फासला गेला आहे. देशातील लाखो गरीब आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आणणारे 'नीट' पेपरफुटीचे प्रकरण अत्यंत निंदनीय आणि निषेधार्ह आहे. सरकारने दोषींवर कठोरात कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

**- प्रदीप मोरे**

## अट्टाहासाने नामस्मरण करावे




**विचारधन**

नामाइतके सूक्ष्म आणि स्थूल साधन नाही. एखादी गोष्ट अगदी कळकळीने सांगायची झाली म्हणजे 'अगदी बेंबीच्या देठापासून सांगतो' असे आपण म्हणतो. त्याप्रमाणे नामही बेंबीच्या देठापासून घ्यावे. कारण सर्व वासनांचा उगम तिथेच आहे. आपण नामाची वस्ती तिथे ठेवून दिली म्हणजे आपोआप वासनाक्षय होईल. उगीच वरवर नामस्मरण करू नये. ते अट्टाहासाने आणि अंत:करणपूर्वक घ्यावे, यातच खरे हित आहे. आता वासनाच मेली तर आम्ही विषय कसे भोगू, याची नाही काळजी करू. भगवंताची सत्ता जाणली की, त्याला सहज जाणता येते. जो जाणेल भगवंत त्याला म्हणावे संत. आपण खेड्यात गेलो की तिथले सभ्य आणि प्रतिष्ठित कोण याची चौकशी करतो. पाटील आम्हाला दिसतो, लोक सांगतात, म्हणून आम्ही त्याची भेट घेऊ शकतो. पण परमात्मा निर्गुण, निराकार, त्याची ओळख कशी करून घ्यावी कळत नाही. आम्हाला कळत नाहीत त्या सर्वच गोष्टी आम्ही कधी खोट्या मानतो का? आपल्याला असणारी तळमळ ही भगवंताची म्हणजे पूर्णत्वाची तळमळ आहे. नास्तिकाचासुद्धा पूर्णत्वाकडे ओढा असतो. तेव्हा या तळमळीला भगवंत हेच औषध आहे. कोणतीही गोष्ट तळमळीवाचून चांगली होत नाही.

# गिरणी कामगारांना घरे (न) देण्यासाठी खटाटोप?

कापड गिरणी मालकांना गिरण्या बंद करण्यास परवानगी देताना गिरण्यांच्या आवारातील १/३ जमिनीवर 'गिरणी कामगारांना मोफत घरे' देण्याच्या तत्कालीन प्रस्तावानंतर ते आता मुंबईबाहेरील विकत घरांसाठी (किंमत साडेनऊ लाख) आणि सहा सदस्यीय समिती नेमण्यापर्यंतच्या कालावधीत येनकेनप्रकारेण चालढकलच सुरू आहे. आता समिती मुंबईत घरांसाठी जागांचा शोध घेणार आहे. त्यामुळे आता शोध घेणार कधी, त्यावर घरे बांधणार कधी अन् प्रत्यक्ष ताबा देणार कधी?



यात किती वर्षे लोटणार? हा सर्व खटाटोप आतापर्यंतच्या मृगजळी आश्वासनाप्रमाणेच होय! मुंबईबाहेर घरे घेण्यास कोण उत्सुक आहे त्याचाही शोध घेणार आहेत. म्हणजेच त्यान्वये मुंबईत घरे न देण्याचा अंतःस्थ हेतू उघड होत आहे. 'गिरणी कामगारांना घरे' हा विषय १९८४ पासूनचा! काही वर्षांनी तो ऋषींचे कूळ शोधण्यापर्यंत जाणार. असंख्य मूळ गिरणी कामगार निवर्तले. बहुसंख्य मूळ गिरणी कामगार सत्तरीपार होऊन वाढता वैद्यकीय खर्च व महागाईमुळे काटकसरी जीवन जगत असल्याने त्यांना (व वारसांनाही) घरे मिळण्यात स्वारस्य उरले नाही. त्यांना आता खरी गरज आहे ती वैद्यकीय खर्चासाठी लागणाऱ्या निधीची. तेव्हा आता मुंबई-मुंबई महानगर प्रदेश वगळता उर्वरित जिल्ह्यांत घरे घेण्यास कोण इच्छुक आहे, याचा शोध घेण्याबरोबरच कोणाकोणाला घर घेण्यास स्वारस्य नाही, याचाही शोध वजा सर्वेक्षण करून अशा गिरणी कामगारांना घराऐवजी त्यांच्या हयातीतच साडेनऊ लाख (म्हाडाने ठरवलेली किंमत) अदा करून घरे देण्याच्या दायित्वतून सरकारने मुक्त व्हावे.

**- किरण चौधरी, दहिसर**

## शिक्षण क्षेत्राची प्रतिमा डागाळू नये

एकेकाळी प्रगतिशील राज्य म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र राज्य, शेतकरी आत्महत्या, महिला अत्याचार आणि राज्यातील भ्रष्टाचार यामुळे राज्याचे नाव पुढे येत आहे. त्यात भर म्हणून नीट परीक्षेच्या पेपरफुटीचे घोटाळे यामुळे राज्याची प्रतिमा आणखी मलिन झाली आहे. त्यात बारावीच्या परीक्षांचे गुण आणि विज्ञान, गणित या विषयांचे गुण मिळविणारे सामान्य विद्यार्थी यांच्या गुणांची तफावत अशा शंका लोकांच्या मनात उद्भवू लागत आहेत. राज्यातील घोटाळ्यांच्या प्रतिक्रिया अधिक प्रसिद्धी मिळवत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य हे शिक्षण केंद्रापेक्षा इतर घोटाळ्यांचे हब बनले आहे, अशी प्रतिमा जनमानसांत निर्माण झाली आहे. राज्यकर्ते आणि विद्यार्थी, पालक यांनी आपल्या राज्याच्या प्रतिमेला आणखी डागाळू न देता राज्याच्या शिक्षण क्षेत्राची प्रतिमा अधिक डागाळली जाणार नाही याकडे अधिक कटाक्षाने लक्ष देण्याच्या अपेक्षा आहेत. शिक्षण क्षेत्र हे सर्वांत पवित्र क्षेत्र मानले जाते. गुरूंना आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान असते. अशा क्षेत्रात असे प्रकार होणे खेदजनक आहे.

**- राजन पांजरी, जोगेश्वरी**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
'गांवकरी प्रकाशन'च्या मालकीचे हे दैनिक छत्रपती संभाजीनगर आवृत्तीचे परवानाधारक आय.ए. व्हिजन प्रा.लि. यांचे वतीने कैलास टॉवर्स, प्लॉट क्र.१, सौजन्यनगर, काल्डा कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ येथून प्रकाशित करण्यात आले.
**कार्यकारी संपादक :** दिनेश राधाकृष्ण हारे* (*पीआरबी कायद्याप्रमाणे प्रकाशित मजकूरास जबाबदार) **प्रकाशक :** दिनेश हारे
**मुद्रक :** कुलभुषणराम तारे, (सोलापूर तरूण भारत मीडिया लि.,) प्लॉट नं. ए-३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को. ऑप. सो., रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ (महाराष्ट्र)

## संक्षिप्त बातम्या

### नांदेड रेल्वे स्थानकातील रिकाम्या डब्याला आग ; जीवितहानी टळली

**नांदेड :** हुजूर साहेब नांदेड रेल्वे स्थानक परिसरात बुधवारी पहाटे एका रिकाम्या रेल्वे डब्याला अचानक आग लागल्याची घटना घडली. ही घटना २१ मे रोजी सकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. संबंधित डबा प्लॅटफॉर्म लाईनपासून दूर उभा करण्यात आला होता. आगीची माहिती मिळताच रेल्वे प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेत अग्निशमनाची कार्यवाही सुरू केली. रेल्वे कर्मचाऱ्यांनी आणि संबंधित यंत्रणांनी शर्थीचे प्रयत्न करून सकाळी ६.४५ वाजेपर्यंत आग पूर्णपणे आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झालेली नाही. आग लागलेला डबा रिकामा असल्याने प्रवासी किंवा रेल्वे कर्मचाऱ्यांना कोणतीही इजा झाली नाही. मात्र, आगीत डब्याचे काही प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. दरम्यान, आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून रेल्वे प्रशासनाकडून याबाबत चौकशी सुरू करण्यात आली आहे. या घटनेमुळे काही काळ स्थानक परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

### बोगस बियाणे व खत विक्रीविरोधात छावा मराठा युवा महासंघ आक्रमक



**नांदेड :** खरीप हंगाम तोंडावर असताना नांदेड जिल्ह्यात बोगस व निकृष्ट दर्जाच्या बियाणे आणि खतांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचा आरोप करत छावा मराठा युवा महासंघाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रदीप पाटील हुंबाड आणि उपजिल्हाप्रमुख विक्रम पाटील बामणीकर यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांची भेट घेतली. निवेदनात काही कृषी सेवा केंद्र चालक कंपनीचे नाव वेगळे असलेले पाकीट वापरून आतमध्ये भेसळयुक्त किंवा निकृष्ट बियाणे विक्री करत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तसेच शेतकऱ्यांकडून जादा दर आकारले जात असून पक्की बिलेही दिली जात नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित कृषी सेवा केंद्रांची चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत व त्यांचे परवाने रद्द करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. यावेळी जिल्ह्यातील विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### वानवाडीत गोवंशाची अवैध वाहतूक ; चौघांवर गुन्हा

**नांदेड :** हदगाव तालुक्यातील वानवाडी येथे गोवंश जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्या चौघांविरुद्ध तामसा पोलिसांनी प्राणी संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई २० मे रोजी दुपारी करण्यात आली. माधव गणेश काचले, रुक्माजी गणेश काचले (रा. वानवाडी), लक्ष्मण हुलप्पा देवकते व बाबू पिरबा धिळगंडे (रा. वाकी, ता. मुदखेड) हे दोन पिकअप वाहनांत चार गोवंश जनावरांना क्रूरपणे बांधून वाहतूक करताना आढळले. पोलिसांनी सुमारे ८ लाख रुपयांची वाहने व ७६ हजार रुपयांची जनावरे जप्त केली. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक बालाजी नरवटे यांच्या फिर्यादीवरून तामसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस कर्मचारी गायकवाड करीत आहेत.

### गागलेगाव फाट्यावर युवकाकडून तलवार जप्त

**नांदेड :** बिलोली तालुक्यातील गागलेगाव फाटा येथे पोलिसांनी एका युवकाकडून बेकायदेशीर तलवार जप्त करून त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. २० मे रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास अमृत शिवाजी बोगरे (वय २२, रा. खपराळा, ता. बिलोली) हा विनापरवाना लोखंडी तलवार बाळगताना आढळून आला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करून तलवार जप्त केली. या प्रकरणी पोलीस कर्मचारी अशोक यरपालवाड यांच्या फिर्यादीवरून रामतीर्थ पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहेकॉ काळे करीत आहेत.

### स्वारातीम विद्यापीठात 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस' संपन्न



**नांदेड :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये आज, दि. २१ मे २०२६ रोजी 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस' अत्यंत गांभीर्याने आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या स्वागत कक्षामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी उपस्थितांना दहशतवाद आणि हिंसाचाराविरुद्ध लढण्याची आणि देशात शांतता, बंधुभाव टिकवून ठेवण्याची सामूहिक प्रतिज्ञा दिली. यावेळी विद्यापीठातील प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने एकत्र येत या प्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदिश कुलकर्णी तसेचराष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाडआदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची प्रतिज्ञा घेतली.

# पोचमपाड धरणाच्या बॅकवॉटरमुळे शेतकऱ्यांचे नुकसान!

## हजारो शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाद्वारे धडकले

**नांदेड / प्रतिनिधी**



पोचमपाड धरणाच्या बॅक वॉटरमुळे शेतीचे नुकसान होणाऱ्या पूरग्रस्त शेतकऱ्यांना कोल्हापूरच्या धर्तीवर विशेष निधी द्या, यासह विविध मागण्यांसाठी जिल्हा शेतकरी जनआंदोलन संघर्ष समितीच्या वतीने गुरुवारी (दि.२१) रोजी मोर्चा काढण्यात आला. विशेष म्हणजे धर्माबाद व परिसरातील हजारो बाधीत शेतकरी दुचाकीवरून मोर्चासाठी नांदेड शहरात दाखल झाले होते.

धर्माबाद तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांची पोचमपाड धरणाच्या बॅक वॉटरमुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या शेतकर्यांना कोल्हापूर येथील शेतकऱ्यांना दिलेल्या निधीच्या धर्तीवर निधी द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी वेळोवेळी जिल्हा प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली होती. याच संदर्भात २३ सप्टेंबर २०२५ रोजी बैठक झाली होती; परंतु बैठकीनंतर बरेच दिवस लोटले, तरी शासनाने कुठल्याही प्रकारची कारवाई न केल्यामुळे पोचमपाड बॅकवॉटरमुळे नुकसान होणारे शेतकरी आक्रमक झाले. त्यांनी धर्माबाद येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर दुचाकी रॅलीद्वारे मोर्चाचे आयोजन केले.

गुरुवारी सकाळी या मोर्चासाठी नांदेड शहरात हजारो शेतकरी दाखल झाले. पोलीस प्रशासनाने यासाठी मोठा बंदोबस्त ठेवला होता. नांदेडमध्ये दुचाकीवर दाखल झालेल्या शेतकर्यांच्या दुचाकी अडवण्यात आल्यानंतर त्यांनी छ.शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी बाधीत शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

या निवेदनात पीकविमा न भरलेल्या शेतकर्यांना पेरणीपूर्वी २५ हजार रूपये द्यावे, पूररेषेअंतर्गत गावांचे वेगळे महसूल मंडळ स्थापन करावे, पूरग्रस्त शेतकर्यांना पीक कापणी प्रयोगाची अट रद्द करून महसूल प्रशासनाच्या पंचनाम्यानुसार पीकविमा मंजूर करावा, वाढलेल्या खतांच्या किंमती कमी कराव्यात, बाभळी बंधार्याच्या बुडीत क्षेत्राचा मंजूर मावेजा तात्काळ वाटप करावा यासह विविध मागण्या नमूद करण्यात आल्या आहेत. या आंदोलनात डॉ.भगवान मनूरकर, जगन शेळके, व्यंकटराव जाधव रोशनगावकर यांच्यासह बाधीत शेतकरी सहभागी झाले होते.

# ब्राऊन शुगरसह नांदेडमध्ये महिलेला अटक!

## ७२.३ ग्रॅम ब्राऊन शुगर जप्त : चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**नांदेड / प्रतिनिधी**

नांदेड शहरात ब्राऊन शुगर विक्री करण्यासाठी आलेल्या अमृतसर (पंजाब) येथील महिलेसह अन्य तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी (दि.२०) रोजी पकडले. आरोपींकडून यावेळी ७२.३ ग्रॅम ब्राऊन शुगर (चिठ्ठा) व दुचाकी जप्त करण्यात आली. चार आरोपींविरुद्ध वजिराबाद पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्ह्यात पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या नेतृत्वात 'ऑपरेशन क्रॅकडाऊन' मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत गुन्हेगारांना जेरबंद करण्यात आले आहे. काहींना हद्दपार तर काहींना स्थानबद्ध करण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीवरून नांदेड शहरात अमृतसर येथून ब्राऊन शुगर विकण्यासाठी आरोपी महिला राजविंदरकौर जर्मनजीतसिंघ महाल (वय ३८) रा.दुरिया जि.अमृतसर आली आहे. ती व येथील स्थानिक आरोपी गुरूमितसिंघ ऊर्फ गुरूसेवकसिंघ (वय २८) रा.शहीदपुरा हे दोघेजणं दुचाकीवरून जिल्हा न्यायालय परिसर ते हिंगोली गेट रस्त्यावरून जाणार आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली. यावरून पोलिसांनी सापळा रचत दोन्ही आरोपींची झडती घेतली. यावेळी त्यांच्याकडे ७२.३ ग्रॅम ब्राऊन शुगर (चिठ्ठा) ज्याची किंमत ३ लाख ६० हजार रूपये व दुचाकी असा एकूण ४ लाख ७० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

त्या दोघांना गुन्ह्यात मदत करणार्या अमनप्रीतसिंघ ऊर्फ मनी जगजीतसिंघ वेदी (वय ३०) रा.नांदेड, जनार्दन ऊर्फ पटेल गोविंदराव सोनटक्के (वय ३१) रा.ब्राह्मणवाडा या चौघांविरुद्ध वजिराबाद पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

# घनकचरा व्यवस्थापन नियमाचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक–फौजदारी कारवाई

**नांदेड / प्रतिनिधी**



जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी इथश्र्च एपींळीूं यांनी घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करून आपला परिसर स्वच्छ ठेवावा. या नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक किंवा फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिला आहे.

भारत सरकार पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयामार्फत घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ निश्चित करून दिले असून, त्याची अंमलबजावणी १ एप्रिल २०२६ पासून सुरु झाली आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ५ मे २०२६ रोजीच्या आदेशानुसार नांदेड जिल्ह्यात १४ मे २०२६ रोजी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ नुसार प्रत्येक नागरिकांनी त्यांच्या घरातील घनकचरा हा ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी कचरा व विशेष देखभाल/घरगुती घातक कचरा या ४ पद्धतीने वर्गीकृत करून घंटागाडीत देणे बंधनकारक आहे. नागरिकांनी उघड्यावरील कचरा जाळू नये. सार्वजनिक ठिकाणी, नालीमध्ये कचरा फेकू नये, सॅनिटरी पॅड, डायपर व्यवस्थितपणे गुंडाळून घंटागाडी स्वच्छता कर्मचाऱ्यास देणे, कोणत्याही परिस्थितीत वैद्यकीय, घातक कचरा घरगुती कचऱ्यात मिसळू नये. रस्त्यावरील विक्रेत्यांनी, व्यापाऱ्यांनी त्यांचेकडील शिल्लक, उष्टे अन्न, डिस्पोजेबल प्लेट, ग्लास, कप, कॅन, नारळाचे कवच, पॅकेजिंग, पाउच इत्यादी कचरा थेट रस्त्यावर न फेकता वर्गीकरणानुसार साठविण्यासाठी वेगवेगळे डब्बे, कंटेनर ठेवावीत.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ मधील नियम ६ अन्वये ईींश्रज्ञ थरीेंश ऋशपशीीीं म्हणजे रहिवासी सोसायटी, अपार्टमेंट, गृहनिर्माण संस्था, सरकारी कार्यालय, विभाग, शैक्षणिक संस्था, रेल्वे-बस स्टेशन, मॉल्स, हॉटेल, हॉस्पीटल, मार्केट, मंगल कार्यालये, स्टेडियम ई. ज्यांचे क्षेत्र २० हजार स्केअर मीटर आहे, जे दररोज ४० हजार लिटर पाणी वापरतात, जे दररोज १०० किलो किंवा त्यापेक्षा जास्त कचरा निर्माण करतात अशा सर्व इथश्र्चयांनी कचऱ्याचे वर्गीकरण करून ओला कचऱ्यावर जागेवर प्रक्रिया करावी व सॅनिटरी, सुका कचरा नगरपरिषद, मनपा किंवा अधिकृत एजन्सीकडे सुपूर्द करावा. जे इथश्र्च संस्था निर्देशांचे पालन किंवा नियमाकडे दुर्लक्ष करतील त्यांचे पाणी, वीज पुरवठा थांबविण्यासंबंधी जिल्हाधिकारी यांना अधिकार आहेत. याबाबतची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी, असेही कळविले आहे.

ओला कचरा : यात खाद्य पदार्थांचे अवशेष (भाताचे पाणी, तेल, मसाले), भाजीपाला, फूलांचे पंखुरी आणि माळा, गवत, बागेचा कचरा (झाडांची कतरणी), कागदाचे अवशेष, दूध आणि दही पात्रे, पशु खाद्य अवशेष इ. समावेश आहे.

सुका कचरा : प्लास्टिक (बॉटल, पाउच, बॅग), कागद (वर्तमानपत्र, पत्रिका, पुस्तके), धातू (अॅल्युमिनियम, स्टील, तांबे), काच (बॉटल, पात्रे, खिडकी), लाकडी वस्तू, (फर्निचर, बक्से), रबर (टायर, जूते), जुने कपडे, (जुनी साडी, कमीज) इ. सॅनिटरी कचरा : सॅनिटरी पॅड, डायपर, फेस मास्क, वाईप्स, हँडग्लोज, सॅनिटरी औषधे (बॉटल, ट्यूब, पाउच), संक्रामक पदार्थ, औषधांचे अवशेष इ. विशेष देखभाल-घरगुती घातक कचरा : बॅटरी (सेल, रिचार्जेबल), ट्यूब लाइट, बल्ब (पारायुक्त), कीटनाशक, खाद अवशेष, ई-कचरा, (जुने फोन, कंप्यूटर पार्टस, ई.), रासायनिक पदार्थ (पेंट, विषारी द्रव) या वस्तुंचा यात समावेश आहे.

# भाग्यनगर पोलिसांकडून दुकानफोडीचा गुन्हा उघड ; ३ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड / प्रतिनिधी**

भाग्यनगर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने इलेक्ट्रिक दुकान फोडीचा गुन्हा उघडकीस आणत ३ लाख १ हजार ७०० रुपयांचे इलेक्ट्रिक साहित्य जप्त केले आहे. या प्रकरणी तीन आरोपींसह चार विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

मालेगाव रोडवरील कृष्णा ट्रेडर्स या दुकानात १५ मे रोजी पहाटे अज्ञात चोरट्यांनी शटर फोडून मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक साहित्य चोरी केले होते. याप्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लश अंतर्गत चोरी व घरफोडीचे गुन्हे उघड करण्याच्या आदेशानुसार गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख व त्यांच्या पथकाने तपास सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे संशयित भंगार वेचणारे इसम मुदखेड येथील असल्याचे समोर आले. त्यानंतर गणेश साहेबराव नक्कलवाड (रा. नंदीनगर, मुदखेड) याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीचा माल जप्त करण्यात आला. या प्रकरणी वैशाली नक्कलवाड, सावित्रीबाई पानकोळे यांच्यासह इतर साथीदारांनाही अटक करण्यात आली आहे. या उल्लेखनीय कारवाईबद्दल पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी पथकाचे कौतुक केले.

# थकीत मजुरीसाठी हमाल मापाडी संघाचा इशारा

## २७ मेपासून बेमुदत कामबंद आंदोलनाची चेतावणी

**नांदेड / प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत अन्नधान्य वाहतुकीच्या कामातील थकीत मजुरी व लेव्हीची रक्कम तात्काळ अदा करावी, अन्यथा २७ मे २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नांदेड हमाल मापाडी हातगाडा संघाने दिला आहे.

संघाचे अध्यक्ष रावसाहेब कांबळे व सचिव चंद्रकांत कोलते यांनी याबाबत प्रधान सचिव, कामगार विभाग, अन्न नागरी पुरवठा विभाग तसेच जिल्हाधिकारी नांदेड यांना निवेदन दिले आहे. निवेदनानुसार, मे. पारसेवार अॅन्ड कंपनी, मे. सिल्वर रोडलाइन्स आणि मे. ओ.के. कोटेचा या वाहतूक कंत्राटदारांनी थेट वाहतूक व दुसऱ्या टप्प्यातील अन्नधान्य हाताळणीचे काम हमालांकडून करून घेतले; मात्र त्याची मजुरी व लेव्हीची रक्कम अद्यापही अदा केलेली नाही.

संघाच्या माहितीनुसार, थेट हमाली व लेव्हीची थकीत रक्कम ३ कोटी ३९ लाख ३१ हजार ८७२ रुपये असून दुसऱ्या टप्प्यातील हाताळणीची थकीत रक्कम २३ कोटी ६ लाख ७ हजार रुपये आहे. एकूण २६ कोटी ४५ लाख ३८ हजार ८७२ रुपये हमालांना मिळणे बाकी असल्याचा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, शासनाच्या नव्या परिपत्रकामुळे नांदेड जिल्ह्यातील २०० ते ३०० हमाल कामगार बेरोजगार होण्याची भीती संघाने व्यक्त केली आहे. त्यामुळे शासनाने नोंदणीकृत हमालांकडूनच काम करून घेण्याचे बंधन वाहतूक कंत्राटदारांवर घालावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी २५ मे रोजी सकाळी ११ वाजल्यापासून २६ मे सायंकाळी ५ वाजेपर्यंत लाक्षणिक धरणे आंदोलन करण्यात येणार असून मागण्या मान्य न झाल्यास २७ मेपासून बेमुदत कामबंद आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे संघाने स्पष्ट केले आहे.

# नांदेड काँग्रेसला नवे नेतृत्व

## जिल्हा अध्यक्षपदी खा. चव्हाण, पावडे तर महानगराची गफार यांच्यावर जबाबदारी



**नांदेड / प्रतिनिधी**

राष्ट्रीय काँग्रेस कमिटीने नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक पदांची घोषणा करत पक्षाला नवे नेतृत्व दिले आहे. या नियुक्त्यांमध्ये नांदेड जिल्हा काँग्रेस (दक्षिण) अध्यक्षपदी खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण, नांदेड जिल्हा काँग्रेस (उत्तर) अध्यक्षपदी विठ्ठल गंगाधर पावडे, तर नांदेड शहर (जिल्हा) महानगर काँग्रेस अध्यक्षपदी अब्दुल गफार यांची निवड करण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाच्या या नव्या नियुक्त्यांमुळे जिल्ह्यातील पक्ष संघटन अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमधून व्यक्त केली जात आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका तसेच संघटन विस्ताराच्या दृष्टीने नव्या नेतृत्वावर मोठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून तळागाळातील कार्यकर्त्यांना बळ देणे, पक्ष संघटना गावपातळीपर्यंत सक्षम करणे आणि युवकांना पक्षाशी जोडण्यावर भर दिला जाणार असल्याचे काँग्रेस वर्तुळातून सांगण्यात येत आहे.

दरम्यान, नव्या नियुक्त्यांनंतर काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून नवनियुक्त अध्यक्षांचे अभिनंदन करण्यात येत आहे. पक्षाच्या बळकटीसाठी आणि आगामी राजकीय वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## नांदेड, हिंगोली, लातूर व धाराशिव जिल्ह्यांना मिळणार स्वतंत्र प्रशासकीय सुविधा

# नांदेड येथे उपसंचालक,भूमी अभिलेख कार्यालयास मंजुरी – खा. डॉ. गोपछडे

**नांदेड / प्रतिनिधी**

राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी मुख्यमंत्री, महसूलमंत्री तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर मोठे यश मिळाले असून, नांदेड येथे उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालय स्थापन करण्यास महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिली आहे. विशेष म्हणजे, पूर्वी छत्रपती संभाजीनगर येथून कार्यरत असलेल्या विभागीय कार्यक्षेत्राचे प्रशासकीय विभाजन करून नांदेड, हिंगोली ,लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांसाठी स्वतंत्र उपसंचालक कार्यालय नांदेड येथे निश्चित करण्यात अखेर मंजूर करण्यात आले आहे.

महसूल व वन विभागाच्या दिनांक २० मे २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार भूमि अभिलेख विभागातील सुधारित आकृतीबंधास मंजुरी देण्यात आली असून, राज्यात नवीन कार्यालयांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली आहे. त्याअंतर्गत नांदेड येथे नवीन उपसंचालक, भूमी अभिलेख कार्यालयाच्या मुख्यालयाबाबत ठोस निर्णय घेण्यात आला आहे. या



संदर्भात खा. डॉ. अजित गोपछडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मागणीसाठी निवेदन सादर केले होते. पूर्वी छत्रपती संभाजी नगर येथे असलेले मुख्यालय हे दळणवळणासाठी नांदेड , लातूर , हिंगोली आणि धाराशिवसाठी दूर होते. त्यामुळे नांदेड येथे हे मुख्यालय व्हावे यासाठी खा. डॉ. गोपछडे यांनी यशस्वी पाठपुरावा केला आहे. नांदेड हे हिंगोली , लातूर आणि धाराशिव या चारही जिल्ह्यासाठी प्रवासासाठी सोयीस्कर ठरणार आहे. परिणामी नागरिकांची कामे वेळेत होतील. पैशाची आणि श्रमाची बचत होईल हे ही निदर्शनास आणून दिले. त्यामुळे नांदेड येथे स्वतंत्र उपसंचालक कार्यालय मंजूर झाल्याने नांदेड, हिंगोली, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांना अधिक जलद, सुलभ आणि प्रभावी प्रशासकीय सेवा उपलब्ध होणार आहेत. खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर नांदेडला हे महत्त्वपूर्ण प्रशासकीय कार्यालय मंजूर केले, म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी विशेष आभार मानले आहेत.

# आमदार धनंजय मुंडे यांनी केली मराठा समाजाची फसवणूक!

## ॲड. अर्जुन सोळंके यांचा सत्ताधाऱ्यांवर घणाघात, मराठा भवनाच्या जागेवरून परळीत रणकंदन

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**






गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मराठा भवनच्या प्रश्नावर अखेर तोडगा निघाल्याचे चित्र निर्माण झाले होते. सकल मराठा समाजाच्या सातत्यपूर्ण आंदोलनानंतर मराठा भवनासाठी २८ गुंठे जागा उपलब्ध करून देण्यात आल्याची घोषणा झाली आणि समाजामध्ये समाधानाची भावना निर्माण झाली. मात्र, आता याच जागेवरून परळीत नवा वाद उफाळून आला असून, या प्रकरणाने राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

सामाजिक कार्यकर्ते तथा सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते ॲड. अर्जुन सोळंके यांनी पत्रकार परिषद घेत परळी नगरपरिषद, नाथ प्रतिष्ठान आणि माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप करत मराठा समाजाची पद्धतशीर फसवणूक करण्यात आली असल्याचा थेट आरोप त्यांनी केला केला आहे. ॲड. सोळंके म्हणाले की, मराठा भवनासाठी जागा मिळावी यासाठी सकल मराठा समाजाने अनेक वर्षे संघर्ष केला. विविध आंदोलने, निवेदने, मोर्चे आणि लोकशाही मार्गाने लढा उभारल्यानंतर ११ मे २०२६ रोजी परळी नगरपरिषदेसमोर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू करण्यात आले. या आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाल्यानंतर प्रशासनाला दखल घ्यावी लागली. १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज जयंतीदिनी नगरपरिषदेकडून मराठा भवनासाठी जागा देण्याबाबत लेखी पत्र देण्यात आले. त्यानंतर नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून मराठा भवनासाठी २८ गुंठे जागा उपलब्ध करून दिल्याचा दावा करण्यात आला. मात्र, या जागेच्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर गंभीर बाबी समोर आल्याचे ॲड. सोळंके यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

त्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित जागा वैद्यनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसरालगत असून ती गट क्रमांक ४१३ मधील दत्तात्रय देवस्थानची इनामी जमीन आहे. या जमिनीच्या सातबाऱ्यावर आणि इतर नोंदींमध्ये ही जागा हस्तांतरित करता येणार नाही, असा स्पष्ट शेरा असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे ही जमीन मराठा भवनासाठी देणे कायदेशीरदृष्ट्या अशक्य असून, मराठा समाजाला दिशाभूल करून बनावट आश्वासन देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. मराठा समाजाला जागा मिळाली असा आभास निर्माण करण्यात आला. प्रत्यक्षात ही जमीन देवस्थानची असून तिचे हस्तांतरणच होऊ शकत नाही. समाजाच्या भावना आणि आंदोलनाचा वापर करून राजकीय श्रेय घेण्याचा हा प्रयत्न आहे, असा घणाघात ॲड. सोळंके यांनी पत्रकार परिषदेत केला.

दरम्यान, या प्रकरणातील सर्व कागदपत्रे आणि पुरावे आपल्या ताब्यात असल्याचा दावा करत ॲड. सोळंके यांनी आगामी काळात नाथ प्रतिष्ठान, परळी नगरपरिषद आणि संबंधित जबाबदार व्यक्तींविरोधात छत्रपती संभाजीनगर खंडपीठ तसेच उच्च न्यायालयात फौजदारी कारवाईसाठी दाद मागणार असल्याचे स्पष्ट केले.तसेच, मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन संपूर्ण वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत ॲड. अर्जुन सोळंके यांनी विविध कागदपत्रांचा दाखला देत सत्ताधाऱ्यांवर जोरदार निशाणा साधला. मराठा भवनाच्या जागेचा प्रश्न आता केवळ सामाजिक न राहता राजकीय संघर्षाचे केंद्र बनत असून, आगामी काळात हे प्रकरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

यावेळी त्यांनी काही तथाकथित मराठा आंदोलकांवरही गंभीर आरोप केले. काही आंदोलक हे सत्ताधाऱ्यांचे हस्तक म्हणून काम करत असून त्यांनी समाजात फूट पाडली. मराठा समाजाच्या आंदोलनाचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी करण्यात आला, असा आरोप ॲड. सोळंके यांनी केला.

**मनोज जरांगे पाटील यांना चुकीची माहिती दिली..**

आ. धनंजय मुंडे यांची वाव्हवा मिळवण्यासाठी परळीतील काही फुटीर मराठा आंदोलकांनी मराठा भवनाबाबत चुकीची माहिती देऊन मनोज जरांगे पाटील यांची दिशाभूल केली आहे. आम्ही सर्व पुराव्यांसह खरी परिस्थिती लवकरच त्यांच्या समोर मांडणार आहोत, असेही ते म्हणाले.

# कडदोरा, बलसुर येथील डीपीचे प्रा. सुरेश बिराजदार यांच्या हस्ते उद्घाटन



**उमरगा/प्रतिनिधी**

तालुक्यातील कडदोरा व बलसुर येथील पाणीपुरवठा विहिरीस २४ तास अखंडित विद्युत पुरवठा मिळावा यासाठी उभारण्यात आलेल्या नवीन २५ के. व्ही. डीपीचे उद्‌घाटन भाऊसाहेब बिराजदार, साखर कारखान्याचे चेअरमन प्रा. सुरेश बिराजदार यांच्या हस्ते सोमवारी (दि.१८) करण्यात आले.

गावातील पाणीपुरवठा विहिरीमध्ये मुबलक पाणी उपलब्ध असूनही वारंवार खंडित होणाऱ्या विद्युत पुरवठ्यामुळे ग्रामस्थांना नियमित पाणीपुरवठा करण्यात अडचणी निर्माण होत होत्या. या समस्येची गांभीर्याने दखल घेत प्रा. सुरेश बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित अधिकाऱ्यांची व ग्रामस्थांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार बलसुर तांडा येथील गावठाणातून पाणीपुरवठा विहिरीपर्यंत नवीन विद्युत १८ पोलसहीत लाईन टाकून २४ तास अखंडित विद्युत पुरवठा करणारा २५ के. व्ही. डीपी बसवण्यात आली. या कामामुळे आता दोन्ही गावांचा पाणीपुरवठा अधिक सुरळीत व नियमित होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

याप्रसंगी बलसुर येथील ग्रामपंचायत उपसरपंच आयुब पटेल, ग्रामपंचायत सदस्य पवन पाटील, माधव नांगरे, दत्तू चव्हाण, किसन चव्हाण, महात्मा गांधी तंटामुक्तिचे अध्यक्ष प्रदीप पाटील, सत्यनारायण जाधव, वसंत साखरे, उमाकांत सूर्यवंशी, रशीद घुडसे, बन्सीलाल चव्हाण, आर. सी. चव्हाण, गुलाबदास चव्हाण, विपुल चव्हाण, सुधीर नांगरे, विशाल पाटील, बलभीम मिरगुडे, मनोज साखरे, कडदोरा येथील साहेबराव पाटील, प्रदीप बालकुंदे, रविंद्र मुगळे, बालाजी रणखांब, सरपंच सुनंदा रणखांब, कमलाकर रणखांब, दगडू कांबळे, ग्रामसेवक प्रशांत भोसले, संदीप पाटील, खंडू बालकुंदे, भरत रणखांब, संतोष आणि नगर सुरवसे, शरद रणखांब, बाळू कुंभार आदी उपस्थित होते.

# श्री भगवान गौरीशंकर मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापना दिनानिमित्त महाअभिषेक

**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील मार्केट यार्ड परिसरामध्ये १९९३ मध्ये श्री भगवान गौरीशंकर मंदिराची प्रतिष्ठापना करण्यात आली. या मंदिराचा प्रतिष्ठापना दिन २२ मे रोजी साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी तथा श्री भगवान गौरीशंकर मंदिर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षाप्रतिभाताई पाटील कव्हेकर यांच्या हस्ते सकाळी ८ वा. महाअभिषेक करण्यात येणार आहे.

दुपारी १२ वा. गौरीशंकर मंदिर भैम परिवाराच्यावतीने महिला भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला श्री भगवान गौरीशंकर चॅरिटेबल ट्रस्ट लातूरचे विष्णू भूतडा, सुभाषअप्पा सुलगुडले, संभाजीराव पाटील, दिनकर पाटील मसलगेकर, उपाध्यक्ष नितीन कोरे, अजित पाटील कव्हेकर यांची उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमाला श्री भगवान गौरीशंकर ट्रस्टचे पदाधिकारी, संचालक, व्यवस्थापकीय समितीचे अध्यक्ष, पदाधिकारी, सभासद, भगवान गौरीशंकराचे भक्तगण यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आलेले आहे.

# पादुका दर्शन सोहळा आर्थिक व्यवहार प्रकरणी आज गांधी चौकात धरणे आंदोलन

**हिशेबाची चौकशी करा : प्रदीप खंडापूरकर यांची माहिती**

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर तालुक्यातील खंडापूर येथे २२ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत पार पडलेल्या उत्सव संतांचा, कुंभमेळा वारकऱ्यांचा पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यादरम्यान देणगी स्वरूपात आलेल्या दहा कोटींपेक्षा जास्त रकमेचा अपहार किशोर जाधव व अन्य आयोजकांनी केला आहे. या प्रकरणातील दोषींवर अटकेची कार्यवाही करून आर्थिक व्यवहाराची सखोल चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी शुक्रवारी (दि. २२) अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलनच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप खंडापूरकर यांनी दिली.

या पादुका दर्शन सोहळ्यात अंदाजे १० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा अपहार करण्यात आल्याची तक्रार अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवं ब्रिक्स ह्युमन राईट मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी एका लेखी निवेदनाद्वारे लातूरच्या पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. या निवेदनात खंडापूर येथे पार पडलेल्या पादुका दर्शन सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील अनेक संत खंडापूर येथे आले होते. या संतांच्या माध्यमातून १०० एकरच्या आवारात भव्य मंडप उभारण्यात आला होता. महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, तेलंगणा आदी भागातून वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सोहळ्यासाठी अंदाजे ३७०० देणगी पुस्तिका छापण्यात आल्या होत्या. दरम्यान यात जवळपास दहा कोटींपेक्षा जास्त रक्कम आणि धान्य या सोहळ्याच्या निमित्ताने जमा झाले होते. याचा सर्व व्यवहार किशोर जाधव शिवणीकर आणि अन्य आयोजकांकडे होता.

यातील काही रकमा काल्याच्या दिवशी जाहीर केल्या. पण सदरील पैशाचा हिशोब अद्याप दिलेला नाही. त्यामुळे संत, वारकरी, भक्तांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. वारकऱ्यांच्या नावावर अशी फावणूक होत असेल तर संबंधितांशी कडक शासन झाले पाहिजे. या प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी (दि.२२) सकाळी नऊ वाजता लातूरच्या गांधी चौकात एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे खंडापूरकर यांनी सांगितले.

# श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत उज्वल यश

**लातूर :** पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे. इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत ९६ विद्यार्थी व इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत ८९ विद्यार्थी पात्र झाले असून विद्यालयाच्या नावलौकिकात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना पाचवी शिष्यवृत्ती विभागप्रमुख शैलेश सुपलकर तसेच निलेश तावशीकर, महादेव गोंदरकर, निशांत कस्तुरे व आठवीच्या विद्यार्थ्यांना आठवी शिष्यवृत्ती विभाग प्रमुख प्रज्ञा नाईक तसेच आदिनाथ कदम, सुलक्षणा गंगथडे, तेजस्विनी सांजेकर यांनी मार्गदर्शन केले व तयारी करून घेतली. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, श्री केशवराज शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, सदस्य नरेंद्र पाठक, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अत्याधुनिक भाजी मंडई उभारण्यासाठी नगर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी केली पाहणी

## नोव्हेंबरपासून उभारणीस होणार प्रारंभ : बाजीराव धर्माधिकारी

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**



परळी नगर परिषदेच्या गणेशपार भागातील भाजी मंडई इमारत अत्यंत जीर्ण झालेली आहे. ती पाडून त्या ठिकाणी मंत्री पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक व सर्व सुविधांनी युक्त नव्या भाजी मंडई इमारतीची उभारणी करण्यात येणार आहे. या नवीन भाजी मंडई उभारणी कामाला नोव्हेंबरपासून प्रारंभ करण्याचा प्रयत्न असून त्यादृष्टीने पहाणी, व्यावसायिक, व्यापारी व शेतकऱ्यांशी संवाद साधल्याची माहिती माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली.

माजी नगराध्यक्ष धर्माधिकारी व न. प. पदाधिकारी यांनी भाजी मार्केट परिसराला भेट देऊन व्यापारी, आडते व शेतकरी बांधवांशी संवाद साधला.अनेक वर्षांपासून या भाजी मार्केटची इमारत धोकादायक अवस्थेत असून, विशेषतः पावसाळ्यात व्यापारी, शेतकरी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याची बाब यावेळी समोर आली. या पार्श्वभूमीवर नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. धोकादायक ठरलेल्या या जुन्या इमारतीच्या पाडकामाची कार्यवाही लवकरच हाती घेण्यात येणार आहे. दरम्यान, नवीन बाजारपेठेमध्ये व्यापाऱ्यांसाठी सुसज्ज गाळे, कॅन्टीन, शेतकरी बांधवांसाठी निवारा शेड, आधुनिक शौचालय व्यवस्था, पाण्याची टाकी, अंतर्गत रस्ते, पथदिवे, संरक्षण भिंत यासह विविध नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. परळी शहराच्या व्यापारी व कृषी अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असलेल्या या बाजारपेठेला नवसंजीवनी देण्याचा नगर परिषदेचा प्रयत्न असून, व्यापारी, शेतकरी आणि ग्राहकांसाठी सुरक्षित, स्वच्छ व आधुनिक बाजारपेठ उभारण्याचा संकल्प असल्याचे बाजीराव धर्माधिकारी यांनी स्पष्ट केले. यावेळी न. प. गटनेते वैजनाथ सोळंके, अंगद माळी, नगर अभियंता ढवळे, नगर रचना विभागाचे यम्मलवाड यांच्यासह व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे सुरू; ८४ नाल्याची ७० टक्के स्वच्छता

**३१ मे पर्यंत होणार सफाई पूर्ण**

**लातूर/प्रतिनिधी**



लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे हाती घेण्यात आली आहेत. ५ एप्रिल पासून या कामांना प्रारंभ झाला असून आतापर्यंत शहरातील प्रमुख ८४ नाल्यांची स्वच्छता करण्यात आली आहे. जवळपास ७० टक्के कामे पूर्ण झाली असून ३१ मे पूर्वी संपूर्ण नालेसफाई केली जाईल, अशी माहिती पालिकेच्या वतीने देण्यात आली.

महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे, मनपा आयुक्त श्रीमती मानसी मीना, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, उपमहापौर स्नेहल उटगे यांच्या आदेशानुसार ही कामे सुरू करण्यात आली आहेत. यासाठी शहरातील ४ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत ४ छोट्या जेसीबी, २ मोठ्या जेसीबी, १ पोकलेन व ६ हायवाच्या माध्यमातून सफाईचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. दरम्यान, दरवर्षी १ मे पासून मान्सूनपूर्व नालेसफाई केली जायची. यावर्षी एक महिना अगोदरच या कामास प्रारंभ झाला आहे. आतापर्यंत शारदानगर मध्ये मणियार यांच्या शेतातील नाला, इंडिया नगर परिसरात औसेकर यांच्या शेतातील नाला, सुळ नगर मध्ये सुळ यांच्या शेतातील नाला, आर्वी गायरान येथील ओढा, जुनी एमआयडीसी परिसर दीप ज्योती नगर मधील बरुरे यांचे शेत ते हलकुडे यांच्या शेतापासून साळुंके यांच्या शेतापर्यंतचा कच्चा नाला यासह इतर असे ८४ नाल्यांची सफाई करण्यात आली आहे.

नाले सफाई केल्यानंतर कचरा उचलून घेण्याची कामेही लगोलग करण्यात आली आहेत. उर्वरित कामे ३१ मे पर्यंत पूर्ण केली जाणार असल्याची माहितीही मनपाच्या वतीने देण्यात आली आहे.

विविध मागण्या, महात्मा गांधी चौकात धरणे आंदोलन

# औषधी विक्रेत्यांच्या देशव्यापी बंदला लातूर जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी**

अखिल भारतीय औषधी विक्रेत्यांच्या देशव्यापी बंदला बुधवारी लातूर जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लातूर जिल्ह्यातील सर्व औषधी विक्रेत्यांनी आपआपली औषधी दुकाने बंद ठेऊन बंद यशस्वी केला. लातूर शहरातील महात्मा गांधी चौकात सकाळी साडेनऊ ते दुपारी एक या वेळेत धरणे आंदोलनही करण्यात आले.

ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीच्या विरोधात बुधवारी (दि.२०) देशव्यापी बंदचे आवाहन केले होते. या आवाहनानुसार लातूर जिल्ह्यातील औषधी विक्रेत्यांनी या बंदमध्ये १०० टक्के सहभाग नोंदविला. औषध विक्री व्यवसाय हा औषधे आणि सौंदर्य प्रसाधने अधिनियमांतर्गत चालवला जातो. औषधांची ऑनलाईन विक्री करण्यासंदर्भात अधिनियमात कोणतीही तरतूद नाही. तरीही केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन औषध विक्रीबाबतची सूचना जारी केली होती. त्या सूचनेचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नसतानाही देशात बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री सुरु आहे. यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून उच्च न्यायालयानेही ऑनलाईन औषध विक्रीस स्थगितीही दिली आहे. असे असतानाही सरकार औषधी विक्रेत्यांच्या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहे. सरकारने कोरोनाच्या काळात औषधांच्या होम डिलिव्हरी देण्याबाबत विशेष सूट दिली होती. कोरोना संपूनही बराच काळ उलटला तरी याबाबतची अधिसूचना रद्द करण्यात आलेली नाही. याचा गैरफायदा घेऊन ऑनलाईन औषध विक्री केली जात आहे. यामुळे अनेक छोटे व्यावसायिक,औषध विक्रेते अडचणीत येत आहेत. ग्रामीण भागातील औषधी वितरण व्यवस्था धोक्यात येत आहे. यासंदर्भात शासन - प्रशासनाकडेही वारंवार निवेदने देण्यात आली आहेत. तरीही यावर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याच्या निषेधार्थ सदर देशव्यापी बंदचे आवाहन करण्यात आले होते.

बंद दरम्यान अत्यावश्यक सेवेसाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये यासाठी जिल्हा केमिस्ट असोसिएशनने जिल्ह्यातील दहाही तालुक्यात पर्यायी व्यवस्था कार्यान्वित केली होती. त्यामध्ये लातूर तालुक्यासाठी ईश्वर बाहेती, नागेश स्वामी, औसा संजय भालकीकर, शेख, निलंगा बालाजी थेटे, राजकुमार धूत, शिरूर अनंतपाळ प्रदीप पाटील, तानाजी सुरवसे, देवणी उद्धव मल्लेशे, महेश हुडगे, उदगीर सत्यवान सूर्यवंशी, रामकुमार सोनटक्के, जळकोट प्रकाश गट्टेवार, अनंत सिद्धेश्वरे, अहमदपूर संगमेश्वर नीला, धनंजय कोत्तावार, चाकूर अरविंद बिरादार, विनोद नीला, रेणापूर श्रीकांत वाघमारे, सुनील बरुरे या पदाधिकाऱ्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आले होते. औषधी विक्रेत्यांचा बंद असला तरी अत्यावश्यक औषधींसाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये याकरिता ही काळजी घेण्यात आल्याचे जिल्हा केमिस्ट असो.चे अध्यक्ष रामदास भोसले यांनी सांगितले. जिल्ह्यातील सर्व औषधी विक्रेत्यांनी या बंदमध्ये सहभाग नोंदवल्याबद्दल लातूर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो.चे अध्यक्ष रामदास भोसले, सचिव अरुण सोमाणी, उपाध्यक्ष ओमप्रकाश बाहेती, अनिल स्वामी, धनंजय जोशी, सत्यवान सूर्यवंशी, रामकुमार सोनटक्के, सहसचिव प्रकाश साखरे, ईश्वरचंद्र बाहेती, अंकुश भोसले, संगमेश्वर नीला, कोषाध्यक्ष अतुल कोटलवार, रमेश भांगडिया, नाथराव मुंडे, नागेश स्वामी, दीपाली निनगुरकर, जयप्रकाश रेड्डी, बालाजी थेटे, रमाकांत भुरकापल्ले आदींनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहेत.

# हिंगोलीत खेळाडूंना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून द्या : जिल्हाधिकारी राहूल गुप्ता

## क्रीडा संकुलांच्या कामांचा आढावा ; खेळाडूंच्या आशा पल्लवीत

**हिंगोली / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील खेळाडूंना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व कामे गतीने व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहूल गुप्ता यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या असून यांच्या अध्यक्षतेखाली २१ मे रोजी जिल्हा तसेच तालुका क्रीडा संकुलांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी संबंधित विभागाची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, तालुका क्रीडा अधिकारी तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.या बैठकीत हिंगोली तालुका क्रीडा संकुलातील विविध कामांचा आढावा घेण्यात आला. कळमनुरी तालुका क्रीडा संकुलामध्ये प्रशासकीय इमारतीचे बांधकाम, संरक्षक भिंतीचे काम तसेच क्रीडांगण समपातळीत करण्याच्या कामांचा आढावा घेण्यात आला. संबंधित कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.औंढा नागनाथ तालुका क्रीडा संकुलातील बॅडमिंटन हॉलचे काम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.तसेच वसमत तालुका क्रीडा संकुलामध्ये फुटबॉल, कबड्डी, व्हॉलीबॉल मैदानांसह जॉगिंग ट्रॅक आदी सुविधा नव्याने निर्माण करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.



### सर्व कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना

सेनगाव तालुका क्रीडा संकुलासाठी अद्याप जागा उपलब्ध नसल्याने संबंधितच विभागांनी तातडीने जागा उपलब्ध करून पुढील कार्यवाही सुरू करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहूल गुप्ता यांनी दिले. यावेळी जिल्हा क्रीडा संकुलासाठी नव्याने जागा उपलब्ध करून घेण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात आले. या ठिकाणी ४०० मीटर धावपट्टी, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल मैदान, स्केटिंग रिंग तसेच इतर अत्याधुनिक क्रीडा सुविधा निर्माण करण्यासाठी नियोजन करण्यात येत असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. जिल्ह्यातील खेळाडूंना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व कामे गतीने व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी गुप्ता यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# हिंगोलीत जल जीवनचा उडाला बोजवारा !

### नांदूरा येथील महिलांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला हंडा मोर्चा

**हिंगोली / प्रतिनिधी**



तालुक्यातील नांदूरा येथे पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे या मागणीसाठी महिलांनी २१ मे गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर हंडा मोर्चा काढला. पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे अन्यथा तीन दिवसानंतर कार्यालयासमोर उपोषण सुरु करण्याचा इशारा महिलांनी दिला आहे.

तालुक्यातील नांदूरा येथे जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेचे कामे झाले आहे. मात्र सदरील काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे झाले असून गावात पाणीही येत नाही तर गावात केवळ सहा इंच ते एक फुट खोलीवर जलवाहिन्या अंथरण्यात आल्याचा आरोप महिलांनी केला आहे. गावात नळ योजना असूनही महिलांची पाण्यासाठी भटकंती होत आहे. जल जीवन मिशन योजने अंतर्गत संपूर्ण गावात नळ पाणी पुरवठा सुरु करावा, अशी मागणी वेळोवेळी करण्यात आली मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप महिलांनी केला आहे. दरम्यान, गावात पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे या मागणीसाठी शोभाबाई जाधव, सिता धोतरे, आशा धोतरे, संगिता जाधव, रंभाबाई शिंदे, रेखा शिंदे, लता कांबळे, सुदेशना कांबळे, संगिता कांबळे, नंदाबाई कांबळे, इंदीराबाई कांबळे, अलका कांबळे, अनुपमा कांबळे, पिंकू कांबळे, रुखमाबाई जाधव, मनीषा कांबळे यांच्यासह महिलांनी गुरुवारी दि.२१) दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर हंडामोर्चा काढला. गावात पिण्यासाठी पाणी नसल्याने महिलांची भर उन्हात पाण्यासाठी भटकंती होत असून गावात तातडीने पाणी उपलब्ध करून द्यावे अन्यथा २४ मेपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा महिलांनी दिला आहे.

# हिंगोलीत रस्त्यावरील विद्युत खांब बनले शोभेची वस्तू !

### ''दिव्याखाली अंधार'' असल्याची स्थिती, रस्त्यावर काळोख

**हिंगोली / प्रतिनिधी**

शहरातील सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाकडे जाणाऱ्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे गेल्या दोन-तीन वर्षांत अत्यंत सुंदर आणि सुसज्ज अशा रूपात रुपांतर झाले आहे. या रस्त्यामुळे शहराच्या वैभवात भर पडली असली, तरी रात्रीच्या वेळी या मार्गावर पसरणारा अंधार सध्या नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

रस्त्याचे सौंदर्य वाढवण्यासाठी बसवण्यात आलेले विद्युत खांब (स्ट्रीट लाईट्स) गेल्या अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याने ''दिव्याखाली अंधार'' अशीच काहीशी स्थिती येथे निर्माण झाली आहे. या महत्त्वाच्या सिमेंट रस्त्यावर प्रशासनाच्या वतीने दुभाजक (डिवायडर) बसवून त्यावर सुंदर झाडे लावण्यात आली आहेत. रस्त्याची शोभा वाढवण्यासाठी आणि रात्रीच्या वेळी वाहनधारकांना त्रास होऊ नये म्हणून आकर्षक विद्युत खांबही उभे करण्यात आले. मात्र, हे लाखो रुपये खर्चून बसवलेले विद्युत खांब केवळ शोभेच्या वस्तू बनून राहिले आहेत. ते अनेक दिवसांपासून बंद असल्याने रात्रीच्या वेळी हा रस्ता पूर्णपणे अंधारात बुडून जातो.

### मॉर्निंग वॉक अन् पोलीस भरतीतील तरुणांची गैरसोय

या रस्त्याचे दृश्य अतिशय विलोभनीय असल्याने शहरात राहणारे बरेचसे नागरिक दररोज सकाळी मोठ्या संख्येने येथे मॉर्निंग वॉकसाठी येतात. तसेच, पोलीस भरती व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे तरुण-तरुणी याच रस्त्यावर पहाटेच्या वेळी धावण्याचा आणि व्यायामाचा सराव करतात. मात्र, पहाटे आणि रात्री असणाऱ्या अंधारामुळे या नागरिकांना व खेळाडूंना अपघाताची भीती सतावत आहे. अंधाराचा फायदा घेऊन अनुचित प्रकार घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

### महत्वाच्या वसाहती आणि शासकीय कार्यालयांचा मार्ग

या रस्त्याला हिंगोली शहरातील अत्यंत महत्त्वाचा मार्ग मानला जातो. कारण या मार्गावर जिल्हा परिषद वसाहत आणि महसूल वसाहत (रेव्हेन्यू कॉलनी) आहे. तालुका क्रीडा मैदान याच रस्त्यावर स्थित आहे. विविध महत्त्वाची शासकीय कार्यालये याच परिसरात आहेत.अशा गजबजलेल्या आणि महत्त्वाच्या रस्त्यावर रात्रीच्या वेळी साधा प्रकाशही नसणे, ही अत्यंत खेदाची बाब असल्याचे नागरिक बोलून दाखवत आहेत.

### लाईट लवकरात लवकर सुरू करा !

**प्रशासनाने कोट्यवधी** रुपये खर्च करून रस्ता तर सुंदर केला, पण येथील विद्युत खांब का बंद ठेवले आहेत ? जर लाईट्स सुरू करायच्या नव्हत्या, तर खांब बसवण्याचा खर्च कशासाठी केला ? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या रस्त्यावरील खांबांवरील लाईट लवकरात लवकर सुरू करून हा मार्ग प्रकाशमान करावा, अशी आग्रही मागणी आता हिंगोलीकरांमधून होत आहे.

# गंगाखेडकरांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहणार

## आ.डॉ. राहूल पाटील यांनी दिला शब्द ; जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांचा नागरी सत्कार

**परभणी / प्रतिनिधी**

गंगाखेड तालुका व मतदार संघ निश्चित बाळासाहेब, उद्धव ठाकरे साहेबांच्या विचारावर प्रेम करणारा आहे त्यात काही शंका नाही. आज पर्यंत मी केवळ परभणी विधानसभा पुरता कार्यक्षेत्र असल्याने मर्यादा येत होत्या. परंतु, आता पक्षाने संपूर्ण परभणी जिल्ह्याची संघटनात्मक जबाबदारी सोपवली आहे. म्हणून यापुढे मी गंगाखेडकरांचा सुख दुःख विकासात्मक कार्यासाठी आणि पक्षाच्या जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहणार आहे, असे प्रतिपादन परभणीचे आमदार डॉ. राहूल पाटील यांनी केले. शिवसेनेचे नूतन जिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांचा व्यापारी संघ व विविध सामाजिक संघटना आणि शिवसेना यांच्या वतीने मोरया फंक्शन हॉल येथे नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र धर्मे,परभणी महानगरप्रमुख डॉ. विवेक नावंदर रिपब्लिकन पक्षाचे राज्य उपाध्यक्ष डॉ. सिद्धार्थ भालेराव, विठ्ठलराव रबदडे, डॉ.सुभाष कदम, माजी जि.प. सभापती श्रीनिवास मुंडे, नगरसेवक धम्मानंद घोबाळे, पंडितराव मुंडे गुरुजी मनोहर महाराज केंद्रे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दगडू सोमानी, सुभाष दादा नळदकर, उपजिल्हाप्रमुख महादेव शेंडगे, बालाजी लोखंडे, साहेबराव कल्याणकर, तालुकाप्रमुख जानकीराम पवार,बापूराव पोळ, छगनराव मोरे, तालुका संघटक धोंडीराम जाधव, शिक्षक सेनेचे बाळासाहेब राखे,सायस चिलगर शिवसेनेचे तालुका अधिकारी भागवत शिंदे शहर संघटक अमोल खटिंग, प्रा. मुंजाजी चोरघडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा. मुंजाजी चोरघडे, सूत्रसंचालन बाळासाहेब राखे नागेश बोरीकर यांनी केले. आभार प्रदर्शन आयोजन समितीच्या वतीने डॉ. मनोहर ब्याळे यांनी मानले.



### चार विधानसभेवर भगवा फडकविणार

यावेळी बोलताना डॉ. पाटील म्हणाले की, परभणी जिल्हा हा कायम शिवसेनेचा बालेकिल्ला राहील यात शंका नाही भविष्यात दोन्ही जिल्हाप्रमुखाच्या शिवसैनिकाच्या मदतीने चार विधानसभेवर भगवा फडकविणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विष्णू मुरकुटे बोलताना म्हणाले की, मला शिवसेनेच्या सर्वोच्च जिल्हाप्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आले ,याचे कारण मी केलेले सामाजिक कार्य, कधीही पक्षभेद न करता प्रत्येकाच्या सुखदुःखात आणि कामात उभा राहून गरजूंना मदत करत राहिलो. या सर्व बाबींचा विचार करून पक्षाने माझ्यावर जबाबदारी दिली आहे ती चोखपणे पार पडणार असे वचन मी उद्धव ठाकरे साहेब आणि आमदार डॉ. राहूल पाटील यांना याप्रसंगी देत आहे.

# नवीन आयकर कायदा-२०२५ संदर्भात जनजागृती कार्यशाळा संपन्न

**परभणी / प्रतिनिधी**



परभणी येथे २० मे रोजी आयकर कार्यालय, यांच्या वतीने नवीन आयकर कायदा-२०२५ बाबत जनजागृती करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन मंगळवारी (दि.१९) जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध व्यापारी व व्यावसायिक संघटनांचे पदाधिकारी, सदस्य तसेच उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आयकर कायद्याचे तज्ज्ञ अभ्यासक, सनदी लेखापाल, टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष तसेच आयकर विभागाचे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयकर अधिकारी संजय रडके यांनी केले. त्यांनी आयकर कायद्याचा इतिहास तसेच नवीन आयकर कायदा-२०२५ मधील ठळक वैशिष्ट्यांबाबत माहिती दिली. मुख्य सत्रात सनदी लेखापाल अनुप शुक्ला यांनी पीपीटी सादरीकरणाद्वारे नवीन आयकर कायद्यातील महत्त्वपूर्ण तरतुदींवर मार्गदर्शन केले. प्रश्नोत्तर सत्रात सनदी लेखापाल श्याम धूत व अनुप शुक्ला यांनी उपस्थित व्यापारी, व्यावसायिक व नागरिकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. व्यापारी वर्गाच्या वतीने सराफा व्यापारी सचिन अंबिलवादे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्यालय अधीक्षक किशोर झाडे यांनी केले. या कार्यशाळेमुळे नवीन आयकर कायदा-२०२५ संदर्भातील व्यापारी, व्यावसायिक, उद्योजक व सर्वसामान्य नागरिकांमध्ये असलेला संभ्रम दूर होऊन स्पष्टता निर्माण झाली. तसेच करदाता, सल्लागार व आयकर विभाग यांच्यातील समन्वय अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# कत्तलीसाठी जनावरांची वाहतूक करणाऱ्या दोघांना पकडले

**बोरी / प्रतिनिधी**

बोरी जिंतूर परभणी रोडवर २१ मे रोजी सकाळी आठ वाजता मराठवाडा दीक्षाभूमीसमोर कत्तलीसाठी जाणाऱ्या चार बैलांची बोरी पोलिसांनी सुटका केली. यामध्ये दोन जणांवर कारवाई करण्यात आली.

यात रियाज झाकीर कुरेशी (वय २४, रा. साबळे गल्ली, जिंतूर, जि. परभणी), तोफिक मुसा कुरेशी (वय ३२, रा. फतन प्लॉट जिंतूर, जि. परभणी) यांना पकडण्यात आले. त्यांच्या ताब्यातील चार जनावरांची सुटका करण्यात आली. यामध्ये एमएच ४ जेके ५२३२ पिकअप बोलेरोसह आठ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी



बोरी पोलिस कर्मचारी प्रकाश मोरे यांच्या फिर्यादीवरून आरोपी रियाज कुरेशी तोफिक कुरेशी यांच्या विरोधात बोरी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरिक्षक रामेश्वर धोंडगे, पोलीस उपनिरीक्षक महादेव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बद्रीनाथ कंठाळे, राजेश चटाळ, महादेव गायकवाड, श्रीराम दंडवते हे करीत आहे.

## विद्यार्थ्यांना लवकरात लवकर न्याय द्या ; दोषींवर कठोर कारवाईची मागणी

# नीट पेपरफुटी प्रकरणी युवक कॉंग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन

**परभणी / प्रतिनिधी**

नीटमधील कथित पेपरफुटी, अनियमितता आणि विद्यार्थ्यांवरील अन्यायाच्या निषेधार्थ युवक कॉंग्रेसच्या वतीने आज मंगळवार १९ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करत निवेदन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सुरू असलेला खेळ तात्काळ थांबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

युवक कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनात म्हटले की, देशातील लाखो विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र परिश्रम घेतात. मात्र, नीट परीक्षेत सातत्याने समोर येत असलेल्या पेपरफुटी, गुणांतील विसंगती आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये असुरक्षितता व नैराश्याची भावना निर्माण होत आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेवरील विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा. तसेच, पंतप्रधान नरेंद मोदी यांनीही विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. हे आंदोलन युवक कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे तथा परभणी युवक कॉंग्रेस प्रभारी भगवानराव पंडागळे यांच्या आदेशानुसार करण्यात आले. सचिन जवंजाळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी जि.प. सदस्य अजित वरपुडकर, सुहास पंडित, मयुर मोरे, अमोल डाखोरे, राजपाल देशमुख, डिगांबर खरवडे, गोविंद झाडे, गोविंद चोपडे, गोविंद शर्मा, दत्ता कदम, कुणाल गायकवाड यांच्यासह युवक कॉंग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### दोषींवर कठोर कारवाई करावी

पेपरफुटी प्रकरणानंतर निर्माण झालेल्या मानसिक तणावामुळे प्रसारमाध्यमांतील वृत्तांनुसार काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटनांचा उल्लेख करत युवक कॉंग्रेसने तीव्र चिंता व्यक्त केली. संबंधित विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत, समुपदेशन आणि पुनर्वसन सहाय्य द्यावे, अशी मागणीही करण्यात आली. तसेच, नीट प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुरक्षित करावी आणि विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

## संक्षिप्त बातम्या

### गणोरीतील पीएमश्री जि. प. शाळेतील कार्यशाळेला प्रतिसाद



**फुलंब्री: पीएमश्री** जिल्हा परिषद प्रशाला, गणोरी येथे नवचैतन्य फाउंडेशन यांच्यावतीने किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी आणि आरोग्य याविषयी कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी मुलींना बायोडिग्रेडेबल सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले.नवचैतन्य फाउंडेशनच्या सचिव श्रीमती विशाखा चव्हाण यांनी मुलींना मोलाचे मार्गदर्शन केले. श्रीमती सायली दलाल यांनी मुलींशी मासिक पाळी आणि त्यादरम्यान घ्यावयाची काळजी याविषयीची माहिती देऊन मनमोकळा संवाद साधला. याप्रसंगी नवचैतन्य फाउंडेशनच्या उपाध्यक्षा श्रीमती ज्योती जाधव, अमोल चव्हाण हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन नोडल टीचर श्रीमती शैलजा नाईकवाडे , सूत्रसंचालन कुमारी सना शेख या विद्यार्थिनीने केले, तर प्रशालेच्या वतीने श्रीमती मोडेकर यांनी नवचैतन्य फाउंडेशन टीमचे आभार मानले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल देशमुख, श्रीमती संगीता बाबरेकर, श्रीमती भारती ठाकरे, श्रीमती रूपाली अन्नदाते, श्रीमती सविता बारसागडे यांची उपस्थिती होती.

### तेजस सोनवणे यांची भायुमोच्या शहराध्यक्षपदी फेरनिवड



**गंगापूर :** शहरातील तेजस सोनवणे यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा शहराध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली आहे. ही निवड प्रदेश कार्यकारिणी सदस्य किशोर धनायत तसेच तालुकाध्यक्ष सुरेश शिंदे यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आली. यावेळी पक्षाने टाकलेल्या विश्वासाबद्दल तेजस सोनवणे यांनी वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले. आगामी काळात युवकांना संघटित करून पक्षाची विचारधारा अधिक प्रभावीपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शहरातील सामाजिक, शैक्षणिक व युवकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. या निवडीबद्दल कार्यकर्ते व मित्रपरिवाराकडून तेजस सोनवणे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### घनसावंगी येथे २४ मे रोजी आरोग्य शिबीराचे आयोजन



**तीर्थपुरी :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त घनसावंगी येथे २४ मे रोजी भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, आरोग्यदूत फाउंडेशन व रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडणार आहे. या शिबिरामध्ये लहान मुलांसाठी मोफत २ डी इको तपासणी तसेच हृदय शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले असून दिव्यांग बांधवांसाठी मोफत मॉड्युलर हात व पाय वाटपही करण्यात येणार आहे.हे शिबिर रविवारी (दि.२४) सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत उपजिल्हा रुग्णालय, घनसावंगी येथे होणार असून या उपक्रमासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार हिकमत दादा उडाण यांनी केले आहे.


### अखेर 'त्या' कंत्राटदारावर गुन्हा दाखल, सुलतानपूरजवळ घडली होती घटना

**खुलताबाद :** खुलताबाद-फुलंब्री महामार्गाचे सिमेंटीकरण झाले खरे, मात्र हा रस्ता आता वाहनधारकांसाठी जीवघेणा ठरू लागला आहे.

**महामार्गावरील भेगेमुळे तरूणाचा मृत्यू प्रकरण**

गदाणा ते सुलतानपूरदरम्यान पाळीचा मळा परिसरात रस्त्याच्या मधोमध एक मोठी उभी भेग पडली आहे. या भेगेमुळे ९ मे रोजी झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांत एका दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणी निष्काळजीपणाबद्दल खुलताबाद पोलिस ठाण्यात रस्त्याच्या कंत्राटदाराविरोधात मंगळवारी (ता.२०) रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी, निखिल अंबादास पवार (रा. चौका, ता. छत्रपती संभाजीनगर) हा तरुण ९ मे रोजी विश्वंभर गणेश पवार याच्यासोबत नवीन दुचाकीवरून भद्रा मारुतीच्या दर्शनासाठी जात होता. या रोडवरील सुलतानपुरजवळील पाळीचा मळा परिसरात रस्त्यातील मोठ्या भेगेमुळे त्यांची दुचाकी अचानक घसरली. घडलेल्या अपघातात निखिलचा जागीच मृत्यू झाला, तर विश्वंभर गंभीर जखमी झाला. या महामार्गावर अनेक ठिकाणी रस्ता खचला असून मोठे तडे गेले आहेत. ज्यामुळे वाहनांचा समतोल बिघडत आहे. याची दखल घेत भाजपचे तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, सभापती सुनीता खंडागळे, प्रकाश वाकळे व मृताच्या नातेवाइकांनी आमदार प्रशांत बंब, महामार्ग पथक व पोलिसांकडे संबंधित कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती.त्यानुसार या रस्त्याच्या कंत्राटदाराविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### फर्दापूर येथील शेख रशीद यांचे निधन



**फर्दापूर :** जगप्रसिद्ध अजिंठा लेण्यांचे पोटर, शेख रशीद शेख बशीर (वय-७५) यांचे बुधवारी (दि.२०) दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात सहा मुली, जावई, नातू असा परिवार आहे.

# फ्रीज खात्यांपासून कोट्यवधींची संपत्ती खरेदी: मटका बुकींची आयकर विभागामार्फत चौकशी करा ; नागरिकांची मागणी

## तीर्थपुरी बनतेय राज्यातील ऑनलाईन मटक्याचे मोठे केंद्र?

**तीर्थपुरी/ प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी येथे ऑनलाईन मटका व्यवहारांचे जाळे दिवसेंदिवस अधिक मजबूत होत असून व्हॉट्सअॅपवर आकडे स्विकारणे, युपीआय पेमेंटद्वारे लाखो रुपयांची वसुली करणे आणि ती रक्कम पुढे मोठ्या बुकींपर्यंत पोहोचवणे, अशा पद्धतीने येथे कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत आहे. परिसरातील अनेक तरुण या साखळीत ओढले गेल्याची चर्चा असून, आता हा प्रकार केवळ जुगारापुरता मर्यादित न राहता मोठ्या आर्थिक नेटवर्कमध्ये परिवर्तित झाल्याचे सांगितले जात आहे.

परिसरातील काही संशयित बँक खाती फ्रीज करण्यात आल्याची माहिती समोर येत असताना, आता आयकर विभागाने याच खात्यांपासून मोठा आर्थिक तपास सुरू करावा, अशी मागणी जोर धरत आहे. मागील चार ते पाच वर्षांतील व्यवहार तपासून कोणत्या खात्यांतून पैसे फिरले, कोणत्या व्यक्तींशी वारंवार व्यवहार झाले आणि शेवटी पैसा कोणत्या मुख्य खात्यांत जमा झाला, याचा सखोल डिजिटल तपास व्हावा, अशी मागणी होत आहे.

युपीआय व्यवहारांमुळे प्रत्येक व्यवहाराची डिजिटल पाऊलखूण उपलब्ध असण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, हजारो छोट्या व्यवहारांमधून तयार झालेली मोठी आर्थिक साखळी उघड होऊ शकते, असे जाणकारांचे मत आहे.

दरम्यान, मागील दोन वर्षांत ऑनलाईन मटका प्रकरणांत दाखल झालेल्या सर्व गुन्ह्यांची एकत्रित यादी तयार करून संबंधित आरोपी, संशयित आणि त्यांच्या संपर्कातील लोकांचे बँक व्यवहार, युपीआय ट्रेल, प्रॉपर्टी खरेदी आणि आर्थिक व्यवहार तपासण्यात यावेत, असे नागरिकांचे म्हणणे आहे. वाढत्या चर्चेमुळे काहींचे शहरांकडे स्थलांतर झाले आहे की काय असा सवाल आता उपस्थित होत असून परिसरात वाढती चर्चा, संभाव्य आर्थिक तपास आणि नाव समोर येण्याच्या भीतीमुळे या नेटवर्कशी संबंधित काही आर्थिकदृष्ट्या सक्षम लोकांनी आता छत्रपती संभाजीनगर तसेच पुणे येथे वास्तव्य करण्यास प्राधान्य दिल्याची चर्चा रंगू लागली आहे. मात्र, शहरात जाऊन लपल्याने कारवाईपासून सुटका होणार नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक देत आहेत. परिसरातील तरुणाई आणि सामान्य कुटुंबांचे आर्थिक नुकसान करणाऱ्या या नेटवर्कमागील मोठे चेहरे समोर आणून त्यांची मालमत्ता, व्यवहार आणि शहरातील हालचालींची सखोल चौकशी व्हावी, अशी भावना नागरिकांमध्ये तीव्र होत असल्याचे दिसून येत आहे.




काही जण फक्त व्यवहार फिरवण्यासाठी वापरले जात असून, मुख्य पैसा मात्र मोजक्या लोकांपर्यंत पोहोचत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे पेमेंट पॅटर्न आणि खाते साखळी तपासून मुख्य सूत्रधारांपर्यंत पोलिसांनी पोहचूण त्यांची पाळे-मुळे खोदणे गरजेचे झाले असल्याचे मत अनेक जण व्यक्त करीत आहे.

### 'किरायाने खाते' रॅकेटचाही तपास महत्वाचा?

तपासापासून बचाव करण्यासाठी काही लोक बँक खाती किरायाने घेत असल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. आर्थिक व्यवहार मर्यादित असलेल्या व्यक्तींच्या खात्यांमध्ये अचानक मोठ्या प्रमाणावर युपीआय व्यवहार होणे, नंतर ती रक्कम विविध खात्यांत फिरवली जाणे आणि शेवटी काही ठराविक खात्यांत जमा होणे, हा प्रकार तपासण्याची मागणी होत आहे.

### पोलीस अधीक्षक संधू यांनी घ्यावी झाडाझडती..

तीर्थपुरी व परिसरात अनेक दिवसापासून ऑनलाइन जुगार मटका घेतला जात असून पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना हा सर्व प्रकार माहित असताना थातूरमातूर कारवाई केली जात आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक संधू यांनी लक्ष देण्याची गरज असून त्यांनी तीर्थपुरी पोलीस ठाण्याची झाडाझडती घेणे आवश्यक झाले आहे.

### बेहिशेबी पैशांतून उभे राहिले प्रॉपर्टी साम्राज्य?

ऑनलाईन मटका आणि अवैध आर्थिक व्यवहारांतून पैसा उभा करणाऱ्या काही मंडळींनी मागील काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर प्लॉट, घरे, शेतजमिनी तसेच व्यावसायिक मालमत्ता खरेदी केल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. काही व्यक्तींचे अधिकृत उत्पन्न मर्यादित असतानाही अल्पावधीत कोट्यवधींच्या मालमत्ता उभ्या राहिल्याने संशय अधिक गडद होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे संशयित प्रॉपर्टी व्यवहारांची स्वतंत्र चौकशी करून संबंधित व्यक्तींचे उत्पन्नाचे स्त्रोत, आयकर विवरणपत्रे, बँक व्यवहार आणि आर्थिक क्षमता तपासण्यात यावी, अशी मागणी होत आहे.



# अपघातस्थळी सापडलेला मोबाईल प्रामाणिकपणे परत

### मुरमा येथे माणुसकीचे दर्शन

**पाचोड/प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील मुरमा शिवारात झालेल्या भीषण अपघातानंतर मृत दुचाकीस्वाराचा हरवलेला मोबाईल प्रामाणिकपणे परत करण्यात आल्याने माणुसकीचे जिवंत उदाहरण समोर आले आहे. गावातील एका नागरिकाने रस्त्याच्या कडेला सापडलेला महागडा मोबाईल कोणताही मोह न बाळगता संबंधित कुटुंबीयांकडे सुपूर्द केल्याने परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील मुरमा येथील अमृत हॉटेलसमोर (दि. १) मे रोजी रात्री आठ वाजेच्या सुमारास दुचाकी व पिकअप वाहनाचा भीषण अपघात झाला होता. या अपघातात रजापूर (ता. पैठण) येथील अनिल येदमळ यांचा जागीच मृत्यू झाला होता. अनिल येदमळ हे दुचाकीवरून छत्रपती संभाजीनगरकडून बीडकडे जात होते. त्याचवेळी बीडकडून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जाणाऱ्या एका पिकअप वाहनाने मुरमा येथे पाचोडकडे जाण्यासाठी अचानक वळण घेतले. यावेळी मागून येणारी अनिल येदमळ यांची दुचाकी पिकअप वाहनाच्या मागील बाजूस जोरात धडकली. या भीषण धडकेत अनिल येदमळ यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दरम्यान, अपघातानंतर अनिल येदमळ यांच्याजवळ असलेला सॅमसंग अल्ट्रा कंपनीचा महागडा मोबाईल सापडत नसल्याचे निदर्शनास आले. नातेवाईकांनी तसेच पोलिसांनी परिसरात शोध घेतला, मात्र मोबाईल मिळून आला नव्हता. त्यामुळे कुटुंबीयांची चिंता वाढली होती. घटनेनंतर दोन दिवसांनी मुरमा येथील राजू मगरे हे त्या रस्त्याने जात असताना रस्त्याच्या कडेला त्यांना मोबाईल पडलेला दिसला. मोबाईल महागडा असल्याचे लक्षात आल्यानंतरही त्यांनी तो स्वतःजवळ न ठेवता प्रामाणिकपणे याची माहिती गावचे सरपंच दिनकर मापारी यांना दिली. सरपंचांनीही मोबाईल सुरक्षित ठेवला. सोमवारी (दि. १९) अनिल येदमळ यांचे बंधू विजय येदमळ हे ग्रामपंचायतीमध्ये संबंधित घटनेची नोंद करण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी मृत अनिल यांचा मोबाईल हरवल्याची माहिती सरपंचांना दिली. यानंतर सरपंच दिनकर मापारी यांनी तत्काळ राजू मगरे यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर राजू मगरे यांनी कोणताही विलंब न लावता मोबाईल विजय येदमळ यांच्या ताब्यात सुपूर्द केला. या घटनेमुळे दुःखद प्रसंगातही समाजात माणुसकी आणि प्रामाणिकपणा अजूनही जिवंत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# मागण्यांवर ठाम; जलसमाधी आंदोलनानंतर शेतकऱ्यांचे आमरण उपोषण

### तिघांची प्रकृती खालावली

**गंगापूर/प्रतिनिधी**



जायकवाडी धरणाच्या फुगवट्यामुळे अंमळनेर व लखमापूर (ता.गंगापूर) परिसरातील शेतीचे गेल्या वीस वर्षांपासून मोठे नुकसान होत असून, भरपाई व संपादनाबाबत शेतकऱ्यांनी वेळोवेळी प्रशासनाकडे मागणी केली पण दखल न घेतल्याने सोमवारी (ता १८) अंमळनेर वस्ती शिवारात गोदावरी पात्रात नऊ तास जलसमाधी आंदोलन केले. त्याचे रूपांतर बेमुदत उपोषणात झाले. तीन दिवस चाललेल्या आंदोलन ठिकाणी महसूल प्रशासनाने मध्यस्थी करून लेखी आश्वासन दिल्यानंतर बुधवारी (ता.२०) मागे घेऊन स्थगित करण्यात आले.

शेतकऱ्यांनी एफटीएल हद्द, संपादनाची कागदपत्रे, हद्दीच्या खुणा व नुकसान भरपाईबाबत मागणी करत सोमवारी सकाळी साडेअकरा वाजता सुरू झालेले कवचट, समुदाय आरोग्य अधिकारी शिल्पा लोंढे, आरोग्य सेवक प्रसाद पाटील, बापूराव कापसे १०२ गाडी चालक संतोष घुले, एचएलएल बाळू शिनगारे यांनी तत्पर आरोग्य सेवा दिली. जायकवाडी धरणाच्या फुगवट्यामुळे उभ्या पिकांचे शंभर टक्के नुकसान होत असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला. गेल्या पाच वर्षांत अनेक आंदोलने करूनही प्रशासनाकडून ठोस कार्यवाही झाली नसल्याने संताप व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, बुधवारी (ता.२०) दुपारी तीन वाजता लोकाभिमुख येत्या आठवड्यात जिल्हाधिकारी यांच्या सोबत शेतकऱ्यांची बैठक घडून आणून न्याय मिळवून देणार आहे. असे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी त्यांच्या शब्दाचा मान ठेवून बेमुदत उपोषण मागे घेतले. लिंबू सरबत पाजून बेमुदत उपोषण सोडण्यात आले. वाघमारे यांच्या मध्यस्थीच्या प्रयत्नाला यश आले. यावेळी समद पठाण, इसा पठाण, राधेश्याम कोल्हे, बालचंद पंडित, कडूबाबा पठाण, शिवाजी दरगुडे, विक्रम पंडित, मुनीर पठाण,किरण साळवे,संतोष टेकाळे, जनार्धन मिसाळ, भाऊसाहेब पंडित, गणेश मिसाळ यांच्यासह आदी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तूर्तास उपोषण सोडले. यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष म्हणजे अमळनेर, लखमापूर येथील शेतकऱ्यांचा प्रश्न वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी उचलून धरला. बुधवारी (दि.२०) शेतकऱ्यांसोबत वंचित बहुजन आघाडी आंदोलनात उतरेल असे निवेदन नायब तहसीलदार सुधाकर मोरे यांना दिले. यावेळी तहसीलदार नवनाथ वागवाड यांच्याशी चर्चा करून उपोषणकर्त्यांना लेखी आश्वासन देऊन उपोषण सोडले. वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळात जिल्हाध्यक्ष रुपचंद गाडेकर, जिल्हा संघटक राजन किर्तने, तालुका अध्यक्ष बाबासाहेब दुशिग, ता. उपाध्यक्ष कारभारी नरवडे, ज्येष्ठ नेते रामनाथ मामा शिराळे, ता. उपाध्यक्ष भास्कर खंडागळे, ता. सदस्य अण्णासाहेब सोनवणे आदी उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र घृष्णेश्वर मंदिराच्या विकास आराखड्याला सुधारित निधीद्वारे मंजुरी

### जिल्हाधिकाऱ्यांची पुरातत्त्व विभागाशी दिल्लीत चर्चा

**खुलताबाद/प्रतिनिधी**

तालुक्यातील वेरुळ येथील १२ वे ज्योतिर्लिंग श्री. घृष्णेश्वर मंदिराच्या विकासासाठी तयार केलेल्या सुधारित २१० कोटींच्या आराखड्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.१८) मंजुरी दिल्यानंतर बुधवारी नवी दिल्लीत भारतीय सर्वेक्षण विभागानेही मंदिराच्या संरक्षित परिसरातील विकासकामांना परवानगी देण्यास होकार दिला. अशी माहिती नियोजन अधिकारी भारत वायळ यांनी दिली.



या आराखड्यानुळे काम करण्याचा मोठा टप्पा पूर्ण होणार आहे. यात घृष्णेश्वर येथे अत्याधुनिक भक्त निवास, दर्शनरांग (प्रतीक्षागृह), व्यापारी संकुल, कार्यक्रम सभागृह, घाट, बाह्य वळण रस्ता आदी कामे होणार आहेत. या बैठकीला वेणुगोपाल रेड्डी, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, सांस्कृतिक व कार्य मंत्रालयाचे सचिव विनोद अग्रवाल, पुरातत्त्व सर्वेक्षणचे अधीक्षक अरुण मलिक, संचालक कर्नल एस. मारवाह, कार्यकारी अभियंता स्मिता पवार, महासंचालक यदुवीर रावत, तसेच एएसआयचे देशपातळीवरील अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, वेरूळ येथे या संरक्षित वास्तू असल्यामुळे कामे करण्यात अडचणी आहेत. दर्शनरांग, लॉन, अतिक्रमण काढणे, संरक्षण भिंत उभारणे, मंदिराच्या आतील कमिटीचे कार्यालय हलवणे शक्य नव्हते. परवानगीमुळे प्रतिबंधित क्षेत्रातील, संरक्षित आणि नियामक क्षेत्रातील कामे करता येणार आहेत.

### प्रहार जनशक्ती पक्षाचे गंभीर आरोप

# शेतकऱ्यांची 'कुशल बिले' अडवत ५० टक्के लाचेची मागणी

**फुलंब्री /प्रतिनिधी**

फुलंब्री तालुक्यातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध समस्यांबाबत प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात गंभीर तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्रहार संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष कृष्णा गाडेकर यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. संबंधित रेशीम अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांची 'कुशल बिले' अडवून ठेवणे, ५० टक्के लाचेची मागणी करणे तसेच शेतकऱ्यांना धमकावणे असे गंभीर आरोप या निवेदनातून करण्यात आले आहेत.

तक्रारीनुसार, फुलंब्री तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून व व्याजाने पैसे घेऊन



रेशीम लागवड केली. प्रत्येकी २० ते २५ हजार रुपये खर्च करून रेशीम रोपे खरेदी करण्यात आली. तसेच लाखो रुपये खर्चून शेड उभारण्यात आले. रेशीम विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून शेड व बागांना मंजुरी दिल्यानंतर 'कुशल बिले' दाखल करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, ही बिले ऑनलाइन प्रक्रियेदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडे मोठ्या रकमेच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी तत्काळ पैसे देण्यास असमर्थता दर्शवल्यानंतर अधिकाऱ्यांनी बिले शेतकऱ्यांच्या वैयक्तिक खात्यावर न टाकता थेट कार्यालयाच्या खात्यावर ऑनलाइन केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेला दोन वर्षांचा कालावधी उलटूनही शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा झालेली नाही. लाच दिल्याशिवाय बिले मंजूर होणार नाहीत तसेच ५० टक्के रक्कम द्या, नाहीतर बिले रद्द करू अशा धमक्या अधिकाऱ्यांकडून दिल्या जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या रेशीम बागांचे नुकसान झाले असून आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रहार संघटनेने संबंधित अधिकाऱ्यांवर तत्काळ फौजदारी कारवाई, उच्चस्तरीय चौकशी आणि अडकलेली बिले त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची मागणी केली आहे.